02 TO 08 MARCH 2026 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 2/28/2026 8:53 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १४ अंक : ७ सोमवार दि. २ मार्च २०२६ ते रविवार दि. ८ मार्च २०२६ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड

वसई-विरार आयुक्तालय परिसरात गुन्हेगारांचाच दरारा बेफिकीर पोलिसांमुळे कायदा व सुव्यवस्थेचे वाजले बारा | ३

सासूचा जीव घ्यायला गेली पण सूनबाईच विधवा झाली | ३

चारित्र्याच्या संशयावरून दोघांमधील वाद वाढला प्रियकराच्या मदतीने पत्नीने पतीचा काटा काढला | ३

पती आणि पत्नीमधील वाद कोर्टात नेला चिडलेल्या जावयाने सासऱ्याचा गेम केला | ३

शिक्षणसेविकेचा विनयभंग करणाऱ्या शाळा संचालकाला मुरूड पोलिसांकडून अटक | ३




## कर्मयोगी ‘मोठे भाऊ’

डोंगर माथे तुडवित आला
एक मसिहा झपाटलेला
‘जैन उद्योग’ उभारताना
कवेत घेतले या शहराला

या मातीचे ऋण फेडाया
सदैव होता ज्याचा ध्यास
विज्ञानाची धरून कास
शेतीच होता त्याचा श्वास

सत्य, अहिंसा आणि निष्ठा
द्रष्टेपण ही त्याची शक्ती
मती झळाळे नम्रपणातून
जसे वागणे तशीच उक्ती

कैवल्याचे झाड जसे ते
कर्तृत्वाने लदबदलेले
‘पद्मश्री’ चा तुरा तयाला
देश-विदेशी गौरविलेले

विद्येचा तो नम्र उपासक
चार दिशांना डंका झडे
विचार पेरीत ग्रंथांमधूनी
आचरणाचे दिले धडे

केळी कांदा ठिबक नळ्या
अन रोपांचे, नवनिर्माण
शेतीसाठी त्यानेच आणले
आधुनिक तंत्रज्ञान...

‘मोठे भाऊ’ बिरुद लाभले
ओथंबे प्रेम जनामनातून
कर्मयोगी हा शेतकऱ्यांना
ठरला एक वरदान...

— अशोक कोतवाल
जळगाव

*श्रद्धेय भवरलालजी जैन यांना*
*श्रद्धावंदनदिनी कृतज्ञतापूर्वक प्रणाम...*

जन्म : १२ डिसेंबर १९३७ निर्वाण : २५ फेब्रुवारी २०१६

भवरलाल अँण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन www.bkjfoundation.org
कांताई नेत्रालय ॲडव्हान्स्ड आय केअर
JAIN HEALTH CARE SERVICES
eye care opticals
जैन स्पोर्टस् अकॅडमी आरोग्य, आत्मनिर्भर, अमेयता.
भाईसाहेब सुंदरलाल मल्हारा पोटेन्शियल डेव्हलपमेन्ट अकॅडमी
जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी. www.jains.com
भवरलालजी आणि कांताई जैन परिवार www.bhavarlaljain.in
जैन फार्म फ्रेश फुड्स लि. मस्त चवीमागचं तुमचं पाककौशल्य. www.jainfarmfresh.com
अनुभूति स्कूल www.anubhutischool.in
गौराई कृषी-तंत्र निकेतन
गौराई ग्रामोद्योग
बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट
गांधी रिसर्च फाऊंडेशन • सत्य • अहिंसा • शांती www.gandhifoundation.net

# अखेर सत्याचाच विजय!

खुदाके घर में देर है मगर अंधेर नही! असे म्हणतात ते काही खोटे नाही. कारण सत्य कधीच लपत नसते. दिल्लीतील दारू घोटाळ्याच्या बाबतीत तसेच झाले. दिल्लीत खऱ्या अर्थाने जनतेचे सरकार चालवणाऱ्या केजरीवाल यांच्या आमआदमी सरकारला दारू घोटाळ्यात अडकवून त्यांचा पक्ष संपवण्याचे कारस्थान रचण्यात आले होते. पण दहा वर्ष बहुमताचे सरकार चालवणाऱ्या केजरीवाल यांनी केंद्राकडून होणाऱ्या दडपशाहीला झुगारून सरकार चालवले. त्यामुळे केजरीवालना लोकशाई मार्गाने हटवणे शक्य नाही हे लक्षात येताच त्यांना दर घोटाळ्यात अडकवून केजरीवाल व त्यांच्या काही सहकाऱ्यांना तुरुंगात डांबले. पण केजरीवाल यांनी न्यायालयीन लढा दिला आणि त्यात त्यांचा आणि या देशातील लोकशाहीचा विजय झाला. केजरीवाल सुटले आणि त्याच बरोबर आम आदमी सरकारचे दारू धोरण म्हणजे घोटाळा नव्हता हेच सिद्ध झाले. दिल्लीतील बहुचर्चित दारु घोटाळा धोरणाशी संबंधित प्रकरणात राउज एवेन्यू कोर्टाने मोठा निर्णय दिला आहे. कोर्टाने दिल्लीचे माजी मुख्यमंत्री, आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल तसचं माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांची निर्दोष मुक्तता केली आहे. कोर्टाकडून दोन्ही नेत्यांना क्लीन चीट मिळाली आहे. हा अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांना मोठा दिलासा आहे. निकालानंतर मीडियाशी बोलताना अरविंद कजेरीवाल भावूक झाले होते. त्यांच्या डोळ्यात अश्रू आले. कोर्टाने निकाल देताना स्पष्टपणे म्हटलं की, नुसता दावा करुन चालणार नाही. कोर्ट कुठल्याही आरोपांवर तेव्हाच विश्वास ठेवेल जेव्हा त्याच्यासोबत भक्कम, पर्याप्त पुरावा असेल. तपास यंत्रणेने दिलेले पुरावे कमजोर आणि अपर्याप्त आहे असं कोर्टाने म्हटलं. राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त राहिलेल्या कुलदीप सिंह यांना सर्वात आधी कोर्टाने निर्दोष मुक्त केलं. त्यानंतर मनीष सिसोदिया यांना दिलासा दिला. मग अरविंद केजरीवाल यांच्या निर्दोष सुटकेचे कोर्टाने आदेश दिले. दाखल केलेल्या आरोपपत्रात अनेक त्रुटी होत्या हे कोर्टाच्या टिप्पणीतून स्पष्ट झालं आहे. असे अनेक मुद्दे आहेत, ज्यावर समाधानकारक उत्तर मिळालेलं नाही असं कोर्टाने म्हटलं. त्याचा आधारावर केजरीवाल आणि सिसोदिया यांना दिलासा मिळालायतपास यंत्रणेचं म्हणणं आहे की, ते कोर्टाच्या निर्णयावर समाधानी नाहीत. याला हायकोर्टात आव्हान देणार. आदेशाचा विस्तृत अभ्यास केल्यानंतर वरच्या न्यायालयात अपील करु असं संकेत सीबीआय वकिलांनी दिले आहेत.न्यायालयाच्या निकालानंतर अरविंद केजरीवाल भावूक झाले होते. माझ्याविरोधातील हे सर्व प्रकरण खोटं होतं. माझी प्रतिमा मलिन करण्यासाठी हे सर्व केलं होतं. आम आदमी पार्टीला संपवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृह मंत्री अमित शाह यांनी मिळून स्वतंत्र भारतातील सर्वात मोठं कारस्थान रचलं असा आरोप अरविंद केजरीवाल यांनी केला. आमच्या पक्षाच्या पाच मोठ्या नेत्यांना तुरुंगात टाकलं. एका विद्यमान मुख्यमंत्र्याला घरात जाऊन अटक करुन तुरुंगात टाकलं, हे भारताच्या इतिहासात कधी झालं नव्हतं असं अरविंद केजरीवाल म्हणाले. त्यांचा हा विजय त्यांना केंद्राच्या अन्याय विरुद्ध लढ्यास निश्चितपणे बळ देईल. या निकालाने केजरीवाल यांची जनमानसातली विश्वासार्हता वाढली आहे.तर भाजपची संपली आहे. केजरीवाल यांची सुरुवातीपासूनची प्रतिमा अत्यंत स्वच्छ आहे म्हणूनतर मोदींच्या विरोधात निवडणूक लढवताना त्यांना २ लाखांहून अधिक मते मिळाली होती. इतकेच नव्हे तर एक प्रबळ आणि तितकाच विश्वासू विरोधी पक्षाचा नेता अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली होती. अण्णांच्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनातून आलेल्या केजरीवाल यांना दिल्लीतील जनतेने नेतृत्वाची संधी दिली आणि त्यांनी एक कुशल प्रशासक म्हणून कारभार करून दाखवला अशा नेत्याला दारू घोटाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न झाला मात्र न्यायदेवतेने त्यांना न्याय दिला. भाजपा सरकारने ज्या दारू घोटाळ्याच्या कांगावा करून केजरीवाल आणि आम आदमी पक्षाच्या नेत्यांना तुरुंगात डांबले त्या घोटाळ्याबाबत एकही ठोस पुरावा तपास यंत्रणा न्यायालयात सादर करू शकल्या नाहीत. याबाबत न्यायालयानेही तपासयंत्रणा चांगलेच झापले. तर तपास यंत्रणांना हाताशी धरून आम आदमी पक्षाला संपवण्याच्या प्रयत्नात असलेल्या भाजपची देशभर फजिती झाली. इतकेच नव्हे तर केंद्रातील भाजपा सरकार सत्तेचा दुरुपयोग करून विरोधी पक्षाला संपवण्याच्या प्रयत्न करीत असल्याचा मोठा मेसेज देशातील जनतेत गेला. त्यामुळे मोदी शहाणा तोंड लपवायला जागा राहिलेली नाही. कारण एवढ सगळ करूनही शेवटी सत्याचाच विजय झाला.

# संत गाडगेबाबा विज्ञानवादी राष्ट्रसंत

गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी शेनगाव तालुका अंजनगाव सुरजी जिल्हा अमरावती येथे परीट समाजात झाला. त्यांचे पूर्ण नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर हे आपल्या लोककार्यामुळे कर्मयोगी गाडगे महाराज म्हणून प्रसिद्धीस आले. त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत बहुजन समाजाला ज्ञानाचा प्रकाश देण्याचे महान कार्य केले. ते नेहमी सांगत देवळात जाऊ, नका मूर्ती पूजा करू नका' सावकाराचे कर्ज काढू नका 'अडाणी राहू नका' पोथी -पुराने' मंत्र-तंत्र 'देव चमत्कार यावर विश्वास ठेवू नका. अशी शिकवण आयुष्यभर देत असत खर्च करू नका पैसे देवासाठी! शिक्षणाला पैसा तोच द्या हो!! नका मंदिराची कमय भर! छात्र जो हुशार त्यास द्यावा!! नको धर्म कृत्य पैसा खर्चूनिया! घेण्यासाठी विद्या तोच खर्च!! शाळेहून थोर ते नाही मंदिर! देणगीदार उदार शाळेला द्या!! भक्तीचा प्रचार नाही श्रेयस कर ! शिक्षण प्रचार सर्वश्रेष्ठ!! गरिबांची तरी फेकावा विश्वास! देवाजीची आज पूर्ण खोटी!! नसलेले देव कोठून येणार !कल्याण होणार कधी सांगा!! स्वतःचा उद्धार करा प्रयत्नाने! शक्तीने' युक्तीने सुखी व्हावे !! गाडगेबाबा ३० वर्षे पंढरपूरला आषाढी कार्तिकीला गेले पण एकदाही देवळात गेले नाही. एकदाही आषाढी कार्तिकीचा उपवास केला नाही .लोकांनी गहाण केलेल्या चंद्रभागेचा किनारा स्वतःच्या झाडूने साफ करायचे. संध्याकाळी कीर्तनाला उभे राहायचे. समोर हजारो माणसे असायची आणि बाबा त्यांना विचारायचे देव पाहिला का? देव? लोकांना वाटायचे अरे आम्ही पंढरीच्या पांडुरंगाला भेटायला आलोय आणि हा आम्हाला विचारतोय देव पाहिला का? देव ? लोक म्हणायचे पाहायला जी बाबा म्हणायचे कमाल आहे ? तुमचा देव कुठे राहतो? लोकांना वाटायचे याला काहीच माहित नाही तेव्हा ते म्हणायचे अरे आमचा देव देवळात राहतो' रंगाने सावळा आहे' त्याचे कटीवरी हात आहेत' त्याच्या बाजूला रुक्माई उभी आहे. बाबा म्हणायची कमाल आहे ? तुमचा देव देवळात राहतो माझा देव माझ्या मनात राहतो तरी लोकांना काही कळत नसायचे मग ते आपल्या मिस्कील वराडी शैलीत म्हणायची तुम्हाला देवाला आंघोळ करते का नाही? लोक म्हणायचे करते तर बाबा म्हणायचे तुम्हाला देवाला आंघोळ कोण घालते? लोक म्हणायचे आम्हीच घालतो जी. बाबा म्हणायच्या रे तुमच्या देवाला स्वतःची आंघोळ स्वतः करता येत नाही,' तर तो तुम्हाला तुमच्या भाग्याच्या आंघोळ काय घालणार? मग बाबा म्हणायचे तुम्हाला तुमच्या देवाला धोतर नेसते का नाही' लोक म्हणायचे नेसते तर बाबा म्हणायचे तुम्हाला देवाला धोतर कोण नेसवते लोक म्हणायचे आम्हीच नेसवतो जी. बाबा म्हणायचे तुमच्या देवाला स्वतःच्या नेसूचे धोतर नेसता येत नाही तो तुम्हाला तुमच्या भाग्याचे वस्त्र काय देणार? पुढे बाबा विचारायचे तुम्हाला देवाला नैवेद्य दाखवते की नाही? लोक म्हणायचे दाखवते बाबा मनाचे दाखवून काय करते ? त्याच्या बाजूला काठी घेऊन बसते. बाबा विचारायचे कशाला? देवाला वाढलेल्या नैवेद्य कावळा' कुत्रा आला तर त्याला हाकला याला .बाबा म्हणायचे अरे जे तुमच्या देवाला त्याच्यासाठी वाढलेल्या नैवेद्याचे रक्षण करता येत नाही ते तुमच्या आयुष्यात रक्षण काय करणार ? आणि पुढे बाबा एक लाख मोलाचा प्रश्न विचारायचे जिता जगता देव कोणी पाहिला का? मग लोक कावऱ्या बावऱ्या बघायचे गाडगेबाबांच्या बाजूला एक माणूस उभा असायचा रापलेला चेहरा' जाडे भरडे खादीचे कपडे' पांढरे शुभ्र दाढी : अनवाणी पाय त्यांच्याकडे बोट दाखवत बाबा म्हणायचे अरे हे भाऊराव पाटील बघा हे महारा मांगाच्या पोराला शिकवण्याचं काम करते ते त्याला देव म्हणा' अरे अडाण्याला शिक्षण द्यावे, रंजल्या गांजल्याची सेवा करावी, मुक्याप्राण्यावर दया करावी 'बापहो देव यांच्यात राहतो. बापहो देवळात राहत नाही देव मनात राहतो बापहो देवळात फक्त पुजाऱ्याचे पोट राहते देव कोणाला दिसला नाही तो कुणाला दिसणार नाही. मग तो दिसतच नाही त्यासाठी एवढा आटापिटा करण्याची गरजच काय? गाडगे बाबा संत तुकारामांचा पुरवा देत म्हणत देव पहावयास गेलो आणि तेथे देव होऊनी ठेलो.

तीर्थयात्रेला जाणाऱ्या लोकांना गाडगेबाबा सांगत तीर्थाला जा पैशाचा नाश जगन्नाथ 'रामेश्वरी' सर्व पोट भरण्याचे देव आहेत. देव देव करता शिनले माझे मन पाणी आणि पाषाण जेथे जेथे !! गाडगेबाबा यांनी कबीराच्या भाषेत लोकांना सांगितले जत्रा हमे पत्रा बिठाया तिरथ बनाया पाणी! दुनिया भरी दिवानी 'पैसे की धुलधानी !! कीर्तनातून गाडगेबाबा नेहमी सांगत दगडाचा देव बोलीत तो कैसा! कवन काळी वाचा फुटेल त्यासी!! व्यसनमुक्तीच्या संदर्भात एकदा गाडगेबाबा वर्धा जिल्ह्यात असताना गांधीजींच्या निमंत्रणावरून त्यांना भेटण्यासाठी ते सेवाग्राम येथे गेले. आसपासच्या लोकांना गाडगेबाबा सेवाग्रामला आल्याची बातमी समजली प्रचंड जनु समुदाय जमा झाला. गांधीजींच्या सांगण्यावरून गाडगेबाबांनी तिथे कीर्तन केले गाडगेबाबांची लोकप्रियता आणि सरळ स्वभाव पाहून महात्मा गांधी मंत्रमुग्ध होऊन गेले. हा स्वच्छ अंतस्थ करण्याचा संत गांधीजींना प्रभावित करून गेला महात्मा गांधी ने संत गाडगेबाबा ना विचारले आपली प्रॉपर्टी किती बाबा म्हणाले काही नाही फक्त एक काटे गाडगे व गोधडी मागे आहे. मृत्यूनंतर तीही जनतेच्या हवाली महात्मा गांधी म्हणाले मैने आज तक ऐसा सच्चा संत देखा नही बाबा, आप एकही महान निर्मोही संत हो असे म्हणून गांधीजीने गाडगे महाराजांच्या पायावर डोके ठेवले. संत गाडगेबाबांचा पत्रव्यवहार फार मोठा होता. स्वतः त्यांना लिहिता येत नव्हते तरी त्यांची बुद्धी अतिशय तरल होती कुठलेही संदर्भ पत्ते त्यांच्या स्मरणात राहत त्यांच्यासोबत सदैव असणाऱ्या वहीत ते पत्ते उतरवून घेतपण बहुतांश पत्रकार लेखकाला क्वचितच त्यांचा उपयोग करावा लागत असे. संत गाडगेबाबा तोंडीत भरभरते पत्ते सांगत असत.

ही सगळी पत्रे त्यांनी लिहून घेतली होती पत्र त्यांना देखणे असे हवे असे वाटेल तसले घाणेरडे वाचता न येणारे अक्षर त्यांना अजिबात आवडत नसे. पत्र लेखकाला बारीक टोक असलेले निब आणि टोक बरोबर वागवावा लागे' स्वतः कोणालाही पत्र लिहिताना मायना अति आदरपूर्वक लिहिलेला त्यांना हवा असे' जसे श्रीमंत 'दानशूर' करणासारखे उदार 'साहेब यास गाडगेबाबांचे अनंत कोटी नमस्कार' पत्रास कारण की 'असे त्यांचे पत्र सुरू होईल, त्यांचे त्यागी नाभिक आणि त्यास देखील अनंत कोटी नमस्कार केवळ वरील विशेष नातं बदललं होईल ह .भ. प. महाभक्त लोकसेवक' दानशूर असे आभूषणे त्यामागे जोडली जात त्यांचे अनुयायी त्यापैकी कित्येक तर वयाने त्यांच्या नातवा एवढे असत पण त्यांनाही पत्र लिहिताना महाराज बाबा असे सुरुवात करीत असे. संत गाडगेबाबा क्रांतिकारक होते पण त्यांना कोणी साधुसंत महाराज म्हटलेले खपत नसे. संताविषयी त्यांना अपार आदर, संत कोणाला म्हणावे यावर अनेक पूर्व संतांचेच दाखले देऊन ते प्रवचन करू लागले म्हणजे त्यांची रसवंती विलक्षण प्रेमादराने नाचू लागे. कुठे ज्ञानोबा' तुकाराम 'एकनाथ' कबीरासारखे मोठमोठे संत आणि कुठे मी? कोणत्या झाडाचा पाला? ही कबुली त्यांच्या प्रत्येक कीर्तनात असे. देव कोटी किंवा संत कोटीपेक्षा साध्या सुध्या मानव कोटीचेच जिने पत्करून मानवतेची कठोर सेवा केली. संत गाडगेबाबांनी आयुष्यभर शेतकरी 'कष्टकरी' जनतेला साक्षरतेचा' साक्षेपाचा 'अखंड उद्योगाचा सहकाराचा आणि काटकसरीचा अट्टाहासी उपदेश केला. सावकार शाहीच्या नि भांडवलशाहीच्या कचाट्यात चुकूनही न जाण्याचा इशारा दिला. माणुसकीला बदनाम करणाऱ्या रुढी' रिवाज 'देवकारवे' यांच्यापासून दूर राहण्याचा उपदेशदिला .संत गाडगेबाबांच्या ४५ वर्षाच्या प्रचार कार्यातले मुद्दे लक्षात घेतले तर त्यांना समाजवादी सत्यशोधक म्हणायलाही काही हरकत नाही.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि गाडगेबाबा यांचे अतूट संबंध होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या बहुजनांच्या चळवळीला गाडगेबाबांनी केवळ पाठिंबा दिला नाही तर आपल्या कीर्तनातून जातीयतेच्या अस्पृश्यतेच्या लोकांच्या मनात असलेल्या खुळ्या कल्पनांचे खंडन करून त्या नष्ट करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यतेच्या विरोधात ते जीवनभर लढले. गाडगेबाबांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरा बद्दल अतिव आदर होता. पंढरपूर येथील मठ त्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण संस्थेसाठी दिला. त्यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील हेही उपस्थित होते. बहुजनांच्या शिक्षणासाठी कार्य करणाऱ्या रत्नांचा तो महान संगम ज्यांनी याची देही याची डोळा पाहिला ते खरोखरच धन्य होत .डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे दिनांक ६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले. ही बातमी समजतात संत गाडगेबाबा नी आपल्या घराचे दार बंद केले व अन्न पाणी सोडून दिले.

डॉक्टर बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाण दिनाचे दुःख सहन न झालेल्या संत गाडगेबाबांनी १४ दिवसात आपले २० डिसेंबर १९५६ रोजी आपला देह सोडला, अशी निष्ठा 'जिव्हाळा' आदर प्रेम व अशा महान कार्याची समाजाला नितांत गरज आहे. अज्ञान अंधश्रद्धा कर्मकांड यावर प्रहार करणारे दोन्ही महामानव लागोपाठ एकाच महिन्यात गेले. सामाजिक कार्याला खेळ बसली ५ मे १९२३ रोजी गाडगे महाराज यांचा मुलगा गोविंद मरण पावला. खारे पाटण रत्नागिरी येथे महाराजांचे कीर्तन सुरू होते कीर्तनात त्यांनाही वार्ता समजली. महाराज एक मिनिट शांत झाले आणि म्हणाले मेले असे कोठ्यानं कोठे काय रडू एकासाठी असे म्हणणारे संत गाडगेबाबा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मृत्यूनंतर मात्र टाहो फोडून रडतात आणि शेवटी १४ दिवस अन्न पाणी सोडून देऊन २० डिसेंबर १९५६ रोजी या जगाचा निरोप घेतात. अशा या महान कर्मयोगी संतांना क्राईम संध्या परिवारातर्फे कोटी कोटी प्रणाम!

– प्राचार्य शंकर सोनवणे लातूर

# न्याय आपल्या दारी : मोफत कायदेशीर मदतीची संकल्पना आणि महत्त्व



भारतीय लोकशाहीमध्ये कायद्याचे शासन या सिद्धांताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. याचा मूलभूत आशय असा की राज्यातील सर्व व्यक्ती, संस्था आणि शासनसत्ता ही कायद्याला आधीन असते आणि कोणालाही कायद्यापेक्षा वरचे स्थान नसते. यासाठी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेत समानता म्हणजेच कायद्यापुढीलच नव्हे तर सामाजिक आणि आर्थिक पातळीवर ही सर्वांना समान संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न होय. याचसोबत न्याय सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हे तत्व ही लोकशाही व्यवस्थेचा मूलधार मानला गेला आहे. राज्यघटनेच्या संदर्भात कायद्याची शासन समानता आणि न्यायप्रवेशनाचा हक्क हे तिन्ही परस्पर पूरक आणि अविभाज्य तत्वे मानले जातात परंतु केवळ कायद्याचे राज्य घोषित करणे पुरेसे नसून या कायद्याखाली सर्व नागरिकांना समसमान वागणूक मिळणे अत्यावश्यक आहे. जर कायद्या पुढील समानता प्रत्यक्ष व्यवहारात साध्य करायचे असेल तर प्रत्येक नागरिकाला न्यायप्रवेशनाची सुलभ उपलब्धता असणे अनिवार्य ठरते कारण न्यायप्रणालीपर्यत पोहोचण्याची आर्थिक सामाजिक आणि संरचनात्मक अडचण राहिली तर समानता केवळ कागदावरील घोषणेतच अडकून राहते. न्याय हा सर्वांना सहज व रास्त उपलब्ध झाला पाहिजे समाजातील सर्व स्तराच्या लोकांना आपापली हक्क ही न्यायप्रणालीमार्फत बजावता आली पाहिजे म्हणून संविधानातील कलम ३९ अ राज्याला असे निर्देश देतो की आर्थिक दुर्बलतेमुळे किंवा सामाजिक असमानतेमुळे कोणत्याही नागरिकास न्यायप्रवेश नाकारला जाऊ नये. या उद्दिष्टाच्या अंमलबजावणीसाठी विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ हा कायदा लागू करण्यात आलेला आहे

द लीगल सर्विसे अथॉरिटीज ॲक्ट १९८७ या कायद्याने राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, प्रत्येक राज्यासाठी राज्य विधी सेवा प्राधिकरण, जिल्ह्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण या विधी सेवा पुरविण्यासाठी प्रस्थापित केले आहेत कायद्याच्या जागृती मधून लोकांच्या बळकटीकरणाकडे वाटचाल करण्यासाठी शासनाने राष्ट्रीय स्तरापासून तालुकास्तरापर्यत अशी एक सुसज्ज आणि भव्य अशी यंत्रणा उभी केली आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (District Legal Services uthority DLS) ही संस्था भारतीय न्यायव्यवस्थेतील तळागाळातील लोकन्यायाची वाहक म्हणून ओळखली जाते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण हा केवळ प्रशासकीय घटक नसून, संविधानिक मूल्यांची अंमलबजावणी करणारा सामाजिक परिवर्तनाचा साधक आहे. विधी सेवा प्राधिकरण व्यवस्था ही भारतीय न्यायव्यवस्थेतील केवळ प्रशासकीय रचना नसून न्याय सर्वासाठी या संविधानिक ध्येयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारी प्रभावी यंत्रणा आहे. न्यायप्रवेशातील आर्थिक आणि सामाजिक अडथळे दूर करून समतेवर आधारित न्यायव्यवस्था घडविण्यात या संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.

या कायद्याचा मुख्य हेतू हा समाजाच्या अक्षम घटना घटकातील लोकांना मोफत आणि सक्षम कायदेशीर सेवा पुरवणे हा आहे जेणेकरून आर्थिक व इतर कारणांमुळे ते न्याया पासून वंचित राहणार नाहीत. इतर नागरिकांना विधी सेवा या सहज उपलब्ध करून घेता येतात पण समाजातील गरीब दुर्बल व निरक्षर लोकांना होणारा खर्च, लागणारा वेळ, प्रक्रिया व अन्य अडचणीमुळे न्यायालयापर्यत पोहोचता येत नाही. हीच दरी मीटविण्यासाठी या प्राधिकरणांची आवश्यकता आहे. न्याय हा मोफत व सहज उपलब्ध करून देता आले तरच सर्वांना समान न्याय हे तत्व पाळता येईल. फक्त न्यायप्रणालीच नाही तर आपल्या कल्याणकारी राज्यामध्ये दुर्बल घटकांच्या सक्षमीकरण व मुख्य प्रवाहामध्ये समाविष्ट करण्यासाठी अनेक कल्याणकारी योजना व विशेष कार्यक्रम राबवले जातात मात्र निरक्षरतेमुळे या योजनांची माहिती अनेक जणांना नसते त्यामुळे अनेक लोक त्यांच्या हक्क व अधिकारांपासून वंचित राहतात. याच्या प्रयोजनासाठी या कायद्याच्या कलम (४) मध्ये प्राधिकरणांची विविध उद्दिष्टे नमूद केलेली आहेत त्यामध्येच कायदेशीर साक्षरता पुरवणे लोकांना कायदेशीर जागरूक करून शिक्षित करणे त्यांचे हक्क फायदे व शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना मार्फत आलेल्या विशेष अधिकारांबद्दल त्यांना सजग करणे हा आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी स्थानिक पातळीवर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

(१) **अर्ज स्वीकारणे आणि पात्रता पडताळणी :** नागरिक न्यायसहाय्यासाठी अर्ज सादर केल्यानंतर, जिल्हा प्राधिकरण त्यांची पात्रता कायद्यानुसार तपासते. उदा. उत्पन्न मर्यादा, सामाजिक वर्गलिंग, वय, अपंगत्व, सामाजिक परिस्थिती हे निकष ठराविक आणि पारदर्शक असतात.

(२) **वकील नियुक्ती व मार्गदर्शन** : पात्र नागरिकांसाठी अनुभवी वकीलांची नियुक्ती केली जाते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वकील पॅनेल तयार करून त्याचे नियमित पुनरावलोकनही करते. नियुक्त वकील केवळ न्यायालयीन प्रतिनिधित्वच करत नाहीत, तर प्रकरणाशी संबंधित कायदेशीर प्रक्रिया, अधिकार आणि उपलब्ध पर्यायांविषयी अर्जदारास सतत मार्गदर्शन व सल्ला देतात. यामुळे न्यायप्रवेशन अधिक कार्यक्षम व नागरिकाभिमुख होते.

(३) **लोकन्यायालयांचे आयोजन** : जिल्ह्यातील विविध न्यायालयांमधील प्रलंबित प्रकरणे लोकन्यायालयांत हलवून तडजोडीने निपटवली जातात. यामुळे वेळ, खर्च आणि मानसिक ताण या तिन्ही बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात बचत होते. लोकन्यायालयांमुळे समाधानकारक आणि टिकाऊ तोडगे निर्माण होण्याची शक्यता अधिक असल्याने ही यंत्रणा सामाजिक न्यायाची प्रभावी साधनरूप ठरते

(४) **कारागृह व संस्थांमधील कायदेशीर मदत :** तुरुंगातील कैदी, महिला आश्रयगृहे, बालसुधारगृहे येथे जाऊन प्रत्यक्ष भेटी घेतल्या जातात. समितीचे प्रतिनिधी या संस्थांना प्रत्यक्ष भेट देऊन समस्यांची माहिती घेतात, प्रकरणांची स्थिती समजून घेतात आणि आवश्यक त्या कायदेशीर उपाययोजना सुचवितात. ही सेवा विशेषतः महत्त्वाची आहे कारण अशा अनेक व्यक्तींना न्यायालयापर्यंत स्वतंत्रपणे पोहोचणे शक्य नसते.

(५) **जागरूकता मोहिमा :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ग्रामीण व शहरी भागात कायदे शिबिरे, पंचायत स्तरावरील बैठक, शालेय कार्यक्रम, आयोजित करते या मोहिमांद्वारे नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांची, कायदेशीर उपाययोजनांची आणि मोफत कायदेशीर मदतीच्या तरतुदींची माहिती दिली जाते.

कलम १२ अंतर्गत खालील व्यक्तींना मोफत कायदेशीर सेवा मिळण्याचा अधिकार आहे. (अ) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीतील सदस्य, (ब) मानव तस्करीचे किंवा भिकारीपणाचे बळी (संविधानातील कलम २३ नुसार), (क) महिला किंवा मुले, (ड) दिव्यांग व्यक्ती (दिव्यांग व्यक्ती अधिनियम, १९९५ नुसार), (ई) अन्यायकारक परिस्थितीत असलेले लोक, जसे की : सामूहिक आपत्तीचे बळी, जातीय हिंसाचाराचे बळी, जातीय अत्याचाराचे बळी, पूर, दुष्काळ, भूकंप किंवा औद्योगिक आपत्तीचे बळी, (फ) संरक्षणगृह, बालगृह, मानसिक रुग्णालय किंवा तुरुंगात असलेले लोक, (ग) अल्प उत्पन्न गट सर्वोच्च न्यायालयासाठीः वार्षिक उत्पन्न ५,००,००० पेक्षा कमी वा इतर न्यायालयांसाठीः राज्य सरकारने ठरविलेली मर्यादा (राज्यानुसार बदलते) वरील कायद्याअंतर्गत लातूरच्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मार्फत भव्य अशा कायदेविषयक महाशिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी रूक्मिणी मंगल कार्यालय, लक्ष्मीप्रयाग बँक्वेट, पोद्दार इंटरनॅशनल स्कूल समोर, औसा बार्शी रिंग रोड लातूर येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना शासकीय योजना, कायदे व कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. तसेच विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच जिल्हा प्रशासन लातूर चे विविध विभागा मार्फत संबंधीत लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत विविध विभागांच्या वतीने वेगवेगळे स्टॉल्स उभारण्यात येणार असून, नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या स्टॉल्सवर योजनांबाबत माहिती, अर्ज प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रांबद्दल मार्गदर्शन केले जाणार आहे. सदरील महा शिवीरास मा. न्यायमूर्ती श्री. एस.जी. चपळगांवकर न्यायमूर्ती उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायमूर्ती न्यायीक जिल्हा लातूर, मा. न्यायमूर्ती श्रीमती वैशाली पाटील-जाधव, न्यायमूर्ती उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायमूर्ती न्यायीक जिल्हा लातूर, मा. श्री. एस.जे. भारूका प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश लातूर तथा मा. अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर तसेच मा. श्री. व्ही. एन. गिरवलकर-सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर व इतर मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

– **डॉ. शुभांगी व्ही. पांचाळ; सहयोगी प्राध्यापक, दयानंद विधी महाविद्यालय, लातूर**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# वसई-विरार आयुक्तालय परिसरात गुन्हेगारांचाच दरारा
# बेफिकीर पोलिसांमुळे कायदा व सुव्यवस्थेचे वाजले बारा

नालासोपारा : क्राईम रिपोर्टर

**पाच वर्षापूर्वी पालघर जिल्हा पोलीस दलाचे विभाजन होऊन मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय अस्तित्वात आले. या नव्या पोलीस आयुक्तलयाअंतर्गत वसई, विरार, नालासोपारा आणि मीरा-भाईंदर यासारखी मोठी आणि परप्रांतीयांचा अधिक भरणा असलेली शहरे येतात आणि या शहरांची लोकसंख्या साधारण ४४ लाखांच्या आसपास आहे. एवढ्या लोकसंख्या असलेल्या शहरांमधील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मीरारोड ते विरार दरम्यान १९ पोलीस ठाणी आहेत. त्यामुळे या १९ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस ठाण्यांमधील पोलिसांची जबाबदारीही तितकीच मोठी आहे. यातील दोन पोलीस ठाणे हे सागरी पोलीस ठाणी आहेत. पण दुर्दैवाने इथली पोलीस यंत्रणा कुचकामी ठरत असल्याने या पोलीस आयुक्तक्षेत्रातील गुन्हेगारीचा आलेख दिवसेंदिवस वाढत आहे. खून, खंडणी, बलात्कार, चोरी, लुटमार, फसवणूक, जमिनी बळकावणे आणि विदेशी नागरिकांकडून सुरु असलेली अमली पदार्थांची विक्री त्यातून व्यसनाधीन होऊन गुन्हेगारीच्या मार्गावर चाललेली तरुणाई या सगळ्या गोष्टींमुळे आज मीरा-भाईंदर ते वसई-विरार, नालासोपारा गुन्हेगारीचा अड्डा बनलाय. खास करून नालासोपाऱ्यातील वाढत्या गुन्हेगारीने संपूर्ण पोलीस यंत्रणे समोर एक मोठे आव्हान उभे केलेय आणि याला कारणीभूतही पोलिसाच आहेत. कारण पोलिसांचे नियंत्रणच राहिलेले नाही. नालासोपारा तर युपी-बिहार बनलाय. तिकडचे तडीपार गुंड नालासोपाऱ्यात येऊन भूमाफिया बिल्डर बनलेत. आणि पोलीस त्यांच्याकडून हप्ते घेवून त्यांचे आश्रयदाते बनलेत. सर्वात महत्वाच म्हणजे नालासोपारा**




**पूर्वेकडील नालासोपारा फाट्यापर्यंत म्हणजे संतोषभवन, पांडे नगर, धानिवबाग, गौराईपाडा या ८ किमीच्या परिसरात युपी-बिहारींनी इतके इतकी अनधिकृत बांधकामे केलेली आहेत आणि इतके बेकायदेशीर धंदे सुरु आहेत कि पोलिसांना आणि महापालिकेला याची माहिती असूनही कारवाई केली जात नाही. या कोण कुठून आले आणि त्याचं काय चालू आहे याची कोणतीही माहिती पोलिसांकडे नाही, तोच प्रकार वसई-विरार आणि नायगाव मध्ये आहे. त्यामुळे इथल्या सर्वसामान्य माणसाचे जगणे मुश्कील झाले आहे. वसई-विरार तालुक्याला मिनी भारत म्हणून ओळखले जाते या भागात कायदा व सुव्यवस्थेचा बट्ट्याबोळ झाला आहे. या सर्व प्रकरणाची जबाबदारी गृहखाते सांभाळणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आहे. पण दुसऱ्यांचे पक्ष फोडण्याच्या घाणेरड्या राजकारणात ते इतके मशगुल आहेत कि त्यांना या सगळ्याची काही पडलेलीच नाही. त्यामुळे भविष्यात मिरारोड ते वसई विरारचा बांगलादेश होऊ शकतो.**

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या मीरारोड मध्ये युपी-बिहार पश्चिम बंगाल दिल्ली आदी भागातून आलेल्या अल्पसंख्यांक लोकांची अधिक संख्या आहे. मीरा रोडला तर मिनी पाकिस्तान म्हणतात या भागात अमली पदार्थ विक्री तसेच सेक्स रेकेट मोठ्या प्रमाणात चालते. या भागात काही स्मगलर लोक राहतात. शिवाय नायजेरियन लोकही राहतात आणि हे सगळे कुठल्या न कुठल्या गुन्हेगारीशी संबंधित आहेत, असे इथले स्थानिकच सांगतात. तर भाईंदरमध्ये गुजराती-मारवाडी लोकांची वस्ती आहे. हा समाज जरी स्वभावाने शांत असला तरी त्यातील काही लोकांचे बेकायदेशीर धंदे असल्याची स्थानिकांमध्ये चर्चा आहे. अर्थात हे सर्व पोलिसांना ठावूक आहे. पण त्यांना या बेकायदेशीर धंदे करणाऱ्यांकडून हप्ते मिळत असल्याने ते गप्प राहतात. त्यामुळे गुन्हेगारी ...पान ६ वर

# सासूचा जीव घ्यायला गेली पण सूनबाईच विधवा झाली

पंढरपुर : क्राईम रिपोर्टर

**जो माणूस दुसऱ्यासाठी खड्डा खोदतो तो खड्डा कधी कधी त्याचीच कबर बनते. असाच काहीसा प्रकार पंढरपूर तालुक्यातील उंबरगावमध्ये घडला आहे. सुनेच्या अनैतिक संबंधावरून सासू सुनेत वाद होता. त्यामुळे चिडलेल्या सुनेने सासूचा काटा काढण्याचा कट रचला, तिने प्रियकराकडून विषारी औषध मागवून घेतले व सासूच्या पाण्याच्या ग्लासात मिसळले. पण पाणी कडू लागले म्हणून सासू ते पाणी प्यायली नाही पण तिचा मुलगा म्हणजेच सुनेचा नवरा ते पाणी प्यायला आणि त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी आरोपी सुनेला आणि तिच्या प्रियकराला पोलिसांनी अटक केली आहे.**



अनैतिक संबंधात अडथळा ठरणाऱ्या सासुला संपवण्यासाठी एका महिलेने मोठा कट रचला होता. परंतु यात सासूचा जीव जाण्याऐवजी नवऱ्याचाच मृत्यू झाला आहे. अनैतिक संबंधात अडथळा ठरणाऱ्या सासूला मारण्यासाठी एका महिलेने विषप्रयोग केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेत सुदैवाने सासू वाचली असून आरोपी महिलेचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पंढरपूर तालुक्यातील उंबरगाव येथील आरोपी महिलेचे गावातीलच एका व्यक्तीशी कथित थि अनैतिक संबंध होते. या प्रकरणाची कुणकुण सासूला लागली होती. यावरूनच सासू-सुनेचा वाद होत होता. दरम्यान आरोपी महिलेच्या प्रियकराने तिच्याजवळ एक विषारी औषध असलेले बाटली दिली. यानंतर आरोपी महिलेने विषारी औषद सासू पाणी पिते त्या भांड्यात टाकले. अशा प्रकारे सासूला मारण्यासाठी सूनेने कट रचला. रात्री सासूने त्या भांड्यातील पाणी पिले. मात्र चव कडू लागल्याने पाण्याचा तांब्या जेवण करत असलेल्या मुलगा समाधान जवळ ठेवला. समाधान यांनी ते पाणी पिले. यानंतर समाधान यास रात्री उलट्या होऊ लागल्या. त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु त्यांचा मृत्यू झाला. सासूला मारण्यासाठी सूनेने केलेल्या विष प्रयोगात स्व:च्याच नवऱ्याचा जीव गेल्याची घटना झाली. या प्रकरणी पंढरपूर ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला पोलिसांनी अटक केले असून चौकशी सुरू आहे.

# संपत्तीचा वाद नात्यासाठी काळ ठरला
# सख्ख्या भावाने बहिणीचा गळा चिरला

चंद्रपूर : क्राईम रिपोर्टर

**पैशामुळेच माणसाच्या सर्व गरजा पूर्ण होतात. पैशामुळेच माणसाच्या स्वप्नांना पंख फुटतात म्हणूनच आजकाल माणसाला फक्त पैसा हवा असतो. पैशासमोर नातीगोती फिकी ठरतात. त्यामुळे पैसा आणि जमीन जायदाद यावरून झालेल्या वादात माणूस जिवलग मित्राचा किंवा रक्ताच्या नात्यातील माणसाचाही जीव घ्यायला मागेपुढे पाहत नाही. भद्रावतीमध्ये अशाच एका घटनेत संपती वरून झालेल्या वादात भावाने सख्या बहिणीची गळा चिरून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी भावाला अटक केली आहे.**

चंद्रपूरमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सख्या भावानेच आपल्या बहिणीची धारदार शस्त्राने गळा चिरुन हत्या केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात आई देखील गंभीर जखमी झाली आहे. भद्रावती शहरातील झाडे प्लॉट परिसरात ही घटना घडली आहे. सुरज शंकर भोंडे (वय २८) असं आरोपीचं नाव असून संजीवनी शंकर भोंडे (वय ३२) असं मृत बहिणीचं नाव आहे. तर पुष्पा शंकर भोंडे (वय ५८) असं गंभीर जखमी झालेल्या आईचं नाव आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.संपत्तीच्या वादातून ही घटना झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. गेल्या तीन ते चार दिवसापासून घरात वाद सुरु होता. यात आई व ...पान ६ वर

# चारित्र्याच्या संशयावरून दोघांमधील वाद वाढला
# प्रियकराच्या मदतीने पत्नीने पतीचा काटा काढला





कितुर (कर्नाटक) : क्राईम रिपोर्टर

**दारुडा पती घर आणि शेती नावावर करून देत नाही म्हणून हिरेनंदीहल्ली येथील विवाहिता कस्तुरी हि आपल्या मुलाला घेवून माहेरी राहत होती. कस्तुरी तब्बल १२ वर्ष माहेरी राहिल्याने तिच्या चारित्र्यावर पती कमलेश संशय घेत होता. याच संशयातून दोघांमध्ये भांडणे होत असत. अखेर या भांडणांना कंटाळून कस्तुरीने प्रियकर आणि आपल्या मुलाच्या मदतीने पतीचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी कस्तुरी तिचा मुलगा आणि प्रियकराला अटक केली आहे.**

लमेश कोटी याचे लग्न सुमारे कुदंगोळ तालुक्यातील तरघट येथील कस्तुरी हिच्याबरोबर सुमारे २५ वर्षापूर्वी झाला. त्यांचा संसार सुखा समाधानाने चालू होता. त्यांना किरण नावाचा २५ वर्षाचा मुलगा ही आहे. कलमेश हा तुमकुर येथे होमकेअर म्हणून कामाला असल्याने तो महिन्या दोन तीन वेळा गावाकडे येत होता. त्यातून तो बाहेर राहत असल्याने त्याला दारू पिण्याचे व्यसन ही लागलेले होते. या कारणातून त्याची रोजच भांडणे पत्नी कस्तुरी बरोबर होऊ लागली. या भांडणात तो पत्नी कस्तुरीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण शिवीगाळ करीत होता. हिरेनंदीहळ्ळी गावात कलमेश याची वडिलार्जीत शेती आणि मोठे घर आहे. कलमेश हा दारूच्या व्यसनाच्या आहरी गेला असल्याने त्याची पत्नी कस्तुरी हि त्याला शेती आणि घर हे मुलगा किरण किंवा माझ्या नावे करा ...पान ६ वर

# प्रेम केले हाच तिचा मोठा गुन्हा झाला
# मुलीच्या लव्ह स्टोरीचा बापाने शेवट केला

बार्शी : क्राईम रिपोर्टर



**कुटुंबातील महिला ही त्या कुटुंबाची इभ्रत असते. त्यामुळे तिने मर्यादेत राहावे अशी कुटुंबातील पुरुषांची अपेक्षा असते. त्यामुळेच शाळा कॉलेजात जाणार्या तरुण मुलींवर तिच्या वडिलांची किंवा भावाची बारीक नजर असते. अशावेळी तिचे वाकडे पाऊल पडत आहे असा संशय जरी त्यांना आला तरी ते संतापतात आणि त्यांच्या संतापातून पुढे काहीही घडू शकते. बार्शी तालुक्यातील वैराग येथे राहणाऱ्या पण बार्शीत शिक्षण घेणाऱ्या एका मुलीचे कॉलेजातील एका मुलाशी प्रेम होते. मात्र या संबंधाची कुणकुण तिच्या बापाला लागताच तो भयंकर चिडला आणि त्याने पोटच्या पोरीची गळा आवळून हत्या केली व मुलीने आत्महत्या केल्याचा बनाव केला, पण पोलिसांनी त्याचा हा बनाव हाणून पाडला आणि आरोपी बापाला अटक केली आहे.**

प्रेमसंबंधांच्या संशयातून बापाने पोटच्या मुलीची गळा आवळून तिची हत्या केली आहे. सोलापुरात ऑनर किलिंगसदृश घटना घडल्यानं खळबळ उडाली आहे. बार्शी तालुक्यातील वैराग येथील रुई येथून ही मोठी घटना घडली आहे. प्रेमसंबंधाच्या संशयातून आरोपी बापानेच आपल्या १७ वर्षीय पोटच्या ...पान ६ वर

# चारित्र्याच्या संशयामुळे तिचा घात झाला
# चिडलेल्या प्रियकराने प्रेयसीचा खून केला

नाशिक : क्राईम रिपोर्टर

**आजकालचे प्रेम हे तकलादू असते. केवळ शारीरिक आकर्षणातून निर्माण झालेल्या अशा तकलादू प्रेमाला फारसे भविष्य नसते. त्यामुळे प्रियकर किंवा प्रेयसी किती काळ एकमेकांच्या प्रेमात राहतील याचा नेम नसतो. थोडे दिवस मौजमजा केल्यावर एकमेकांमधला इंटरेस्ट संपला कि मग प्रेयसी किंवा प्रियकर दुसऱ्या शिकारीच्या मागे लागतात, अशावेळी त्या दोघांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण होते. आणि याच संशयातून दोघांमध्ये दुरावा निर्माण होतो. इतकेच नव्हे तर आपली प्रेयसी दुसऱ्याच्या प्रेमात पडलीय असा संशय जरी प्रियकराला आला तरी प्रियकराच्या मनात सुडाची भावना निर्माण होते. बुलढाणा जिल्ह्यात राहणाऱ्या व शिक्षणासाठी नाशिकमध्ये आलेल्या अथर्व याचे एका मुलीशी प्रेमसंबंध होते, पण ती मुलगी दुसऱ्याबरोबर आहे असा अथर्व याला संशय होता. याच संशयातून त्याने आपल्या मित्रांच्या मदतीने प्रेयसीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**






नाशिकच्या सारूळ येथील जंगलात काल एका अल्पवयीन मुलीचा मृतदेह आढळून आला होता. या मृतदेहाची ओळख पटली असून या हत्या प्रकरणाचा देखील उलगडा झाला आहे प्रियकराने मित्राच्या मदतीने अल्पवयीन प्रेयसीला संपवल्याची घटना घडली आहे. या हत्याप्रकरणी नाशिक ग्रामीण पोलिसांनी दोन संशयित आरोपींना देखील ताब्यात घेतले आहे. नाशिकच्या वाडीवरहे पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या सारूळ येथील जंगलात काल एका अल्पवयीन मुलीचा मृतदेह आढळून आला होता. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मृतदेहाचा पंचनामा करून जिल्हा शासकीय रुग्णालयात आणला दरम्यान पोलिसांनी तपासाची चक्र ...पान ६ वर

# पती आणि पत्नीमधील वाद कोर्टात नेला
# चिडलेल्या जावयाने सासऱ्याचा गेम केला

सोलापूर : क्राईम रिपोर्टर



**कौटुंबिक वाद कधी कधी टोकाला जातात आणि त्यात एखाद्याचा जीवही जातो. त्यामुळे हे वाद लवकरात लवकर मिटवायचे असतात. पण जर का ते लवकर मिटले नाहीत तर अशा वादातून सुडाची भावना निर्माण होते आणि सुडाने पेटलेला माणूस कोणत्याही थराला जातो. सोलापूरच्या पानमंगळूर गावात अशाच एका घटनेत मुंबई पोलीसदलात कॉन्स्टेबल असलेल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणाऱ्या एका इसमाने पत्नीवरील राग सासऱ्यावर काढला. कारण सासऱ्याने आपल्या मुलीला घटस्फोट घ्यायला सांगितले होते. याच रागातून जावयाने सासऱ्याची हत्या केली व आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे.**



दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी गावात जावयाने सासऱ्याचा गळा चिरून ठार केले आहे आणि स्वतः आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. सादिक दफेदार (वय ३५, रा. पानमंगरूळ, ता. दक्षिण सोलापूर) असे जावयाचे नाव आहे. सिकंदर मुलका शेख (वय ५५, रा. इंगळगी, ता. दक्षिण सोलापूर) असे मृत सासऱ्याचे नाव आहे. २४ फेब्रुवारी रोजी मंगळवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास सिकंदर शेख हे शेतात होते, त्यावेळी शेतात कोणी नसल्याचा फायदा जावई सादिक दफेदारने उचलला. घरगुती कारणावरून जावई अनेक महिन्यांपासून सासऱ्यावर ...पान ६ वर

# शिक्षणसेविकेचा विनयभंग करणाऱ्या शाळा संचालकाला मुरूड पोलिसांकडून अटक

लातूर : क्राईम रिपोर्टर

बारावी परीक्षेच्या दरम्यान आश्रम शाळेमध्ये कामानिमित्त आलेल्या एका सेविकेचा मोबाईल नंबर हस्तगत करून तिचा पाठलाग करत वारंवार फोन करून पैशाचे प्रलोभन दाखवून शरीर सुखाच्या मागणीसाठी लॉजवर बोलवण्याचा तगादा लावणाऱ्या संस्थाचालका विरोधात मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सदरील संस्था चालकास अटक करण्यात आली असून बाबुराव किसन जाधव असे या संस्थाचालकाचे नाव आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी वसंतराव नाईक प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा पिंपळगाव आंबा येथे बारावीची परीक्षा सुरू आसल्याने तेथे नेमणूकीस आसलेल्या एका वरीष्ठ सेविका महिलेने मी एकटीच आहे. तु मदतीला ये असे सांगुन पिडीत तरुणीला बोलावून घेतले. त्यामुळे पिडीत तरूणी आपल्या गावाकडून पिंपळगाव आंबा येथील आश्रम शाळेवर गेली. त्यावेळेस पडीत महिलेच्या सहकारी महिलेने तू येथे माझ्या मदतीला थांब असे सांगितले. त्यावेळेस तेथे वसंतराव नाईक प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक आश्रम शाळा पिंपळगाव आंबाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव किसन जाधव हे आले. संस्था चालकाच्या मुलाने त्या तरूणीची ओळख आपल्या वडिलांना करून दिली. तसेच ती आपल्या गावातच सेविकेचे काम करत आसल्याची माहीती दिली. त्यावेळेस संस्थाचालक बाबुराव किसन जाधव यांनी सदरील तरुणीचा मोबाईल क्रमांक घेतला. दरम्यान १९ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास ती तरुणी लातूर येथील क्रीडा संकुलन येथे मॉर्निंग वॉकला गेली असता त्यावेळेस बाबुराव जाधव यांनी तिला गाठले व तेथे आपण जेवण करायला बाहेर जाऊ, तुला पैसे देतो, तुला सुट्टी कधी असते आपण लॉजवर भेटू असे म्हणाले. पण त्या मला असले काही आवडत नाही असे सांगितले व तिथून ती निघून गेली. त्यानंतर बाबुराव जाधव यांनी तरुणीला






वारंवार फोन केले दरम्यानच्या काळात बऱ्याच वेळेस त्या तरुणीने बाबुराव जाधव यास मला फोन करू नका असेही सांगितले. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी बाबुराव किसन जाधव यांनी फोन केला. तसेच २२ फेब्रुवारी २०२६ रोजी पण फोन करून तिची अधिक माहिती घेतली. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी ...पान ६ वर

02 TO 08 MARCH 2026 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 2/28/2026 8:55 PM Page 1



# भिवंडी महानगरपालिका भंडारगृहात अनेक वाहन वापराविना धूळखात, मनसेचा भ्रष्टाचाराचा आरोप






**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडी महानगरपालिकेच्या कोंबडपाडा येथील भांडार गृह विभागात खरेदी करण्यात आलेली महागडी उपकरणे व वाहने वापराविना धुळखात पडून असल्याने सार्वजनिक निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे. मनसेच्या विधी विभागाचे जिल्हा संघटक ॲड. सुनील देवरे व शहर सचिव कुणाल आहिरे यांनी हा प्रकार उघडकीस आणत मनपा आयुक्त अनमोल सागर यांच्या कडे लेखी तक्रार दाखल केली आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी सुमारे ५० ते ६० लाख रुपये खर्च करून तीन वर्षांपूर्वी खरेदी केलेली बेलिंग मशीन आज पर्यंत एकदाही वापरली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच कचरा उचलण्या साठी शेकडो हातगाड्या धुळखात पडल्या आहेत.

जनतेच्या करातून खरेदी केलेले हे उपकरण निष्क्रिय ठेवणे म्हणजे कंत्राटदारांचे हित साधण्यासाठी नियोजित भ्रष्टाचार असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. २५ ऑक्टोबर २०२१ रोजी खरेदी केलेले अग्निशमन दलाचे वाहन क्र.एम एच ०४ के यू २४५९ तसेच आणखी एक वाहन किरकोळ तांत्रिक कारणांमुळे अनेक महिन्यांपासून भांडार गृहात पडून असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. भिवंडीसारख्या दाट लोकवस्तीच्या शहरात आगीच्या घटना वारंवार घडत असताना उपलब्ध साधनसामग्री वापराविना ठेवणे हा गंभीर निष्काळजीपणा असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणात प्रशासकीय अधिकारी व ठेकेदार यांच्यात साटेलोटे असल्याचा आरोप करत मनसेने उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.

# पाणी चोरी प्रकरणाची चौकशी होणार -उपायुक्त स्वाती देशपांडे

## बेकायदेशीर पाणी जोडण्यांवर पालिका कडक, विरारमध्ये कारवाईची तयारी

**विरार : वार्ताहर**

वसई विरार शहर महापालिका अंतर्गत विरार पूर्व येथील प्रभाग क्रमांक 'सी' मधील पाणीपुरवठा विभागात मोठ्या प्रमाणात पाणी चोरी होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. नागरिकांनी आरोप केला आहे की या संपूर्ण प्रकरणाकडे पाणीपुरवठा अधीक्षक सचिन पाटील यांनी कथितपणे दुर्लक्ष केले. साईनाथ नगर, घासकोपरी, कोपरी, चंदनसार, शिरगाव, भातपाडा, एचडी इंडस्ट्री परिसर, गडगापाडा तसेच कुंभारपाडा या भागांमध्ये अनेक हॉटेल्स, बेकायदेशीर इमारती, चाळी आणि काही कंपन्या महापालिकेचे पाणी अवैधरित्या वापरत असल्याचे समोर आले आहे. अनेक ठिकाणी मुख्य जलवाहिनीवरून थेट बेकायदेशीर जोडण्या घेतल्याची माहितीही पुढे आली आहे. त्यामुळे नियमित कर भरणाऱ्या नागरिकांना पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागत आहे. स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे की वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पाणी चोरीमुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असून संपूर्ण जलवितरण व्यवस्थेवर अतिरिक्त ताण वाढत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की कर भरणाऱ्या नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नाही, तर



दुसरीकडे बेकायदेशीर वापर सुरूच आहे. पाणी हा मूलभूत हक्काशी संबंधित विषय असल्याने पाणी चोरी रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवून बेकायदेशीर जोडण्या तोडाव्यात, दोषींवर कडक कारवाई करावी आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी जोर धरत आहे. या प्रकरणी महापालिकेच्या उपायुक्त स्वाती देशपांडे यांनी पाणी चोरी प्रकरणाची चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. दरम्यान, नुकतेच पदभार स्वीकारलेल्या महापौर अजीव पाटील या प्रकरणात कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बेकायदेशीर बांधकामांना पाणी जोडण्या कोणी दिल्या, संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी काय आहे आणि आतापर्यंत कोणती चौकशी झाली याची सविस्तर तपासणी करून कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# भोगेश्वर मंदिर देणार मुलीच्या लग्नासाठी आर्थिक मदत



**देवणी : वार्ताहर**

देवणी तालुक्यातील तळेगाव येथे श्री भोगेश्वर महादेव मंदिर ट्रस्टच्या नवनिर्वाचित पदाधिकारी व विश्वस्तांना धर्मादाय आयुक्त, लातूर यांच्या आदेशान्वये पदभार देण्यात आला. विश्वस्तांचा सत्कार हभप विठ्ठल महाराज शिवणखेडकर यांच्या हस्ते करण्यात आला. मंदिर समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष मालबा रामराव घोणसे, पुजारी व कायम विश्वस्त भगवान दत्तू बन, सचिव व्यंकटराव बाबुराव पाटील, विश्वस्त राजकुमार महादू बन, तानाजी धोंडीराम अट्टरगे, शिवाप्पा अण्णाराव रोट्टे यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष मालबा घोणसे यांनी तळेगावकरांच्या इतिहासात नवीन काहीतरी करून दाखवण्याचे आश्वासन दिले. मंदिर समितीने तळेगावातील मुलींच्या लग्नासाठी ११ हजाराची आर्थिक मदत केली जाणार आहे. भजनी मंडळाला लागणारे सर्व साहित्य पुरविण्याचे आश्वासनही दिले. यानिमित्त रुद्राभिषेक हभप विठ्ठल महाराज शिवणखेडकर यांचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन केले होते. यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, जिल्हा परिषद सदस्य औदुंबर पांचाळ व परिसरातील भाविक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंगद घोणसे, रामभाऊ बिरादार, विजयकुमार देशमुख, सोपान धनेगावे, कृष्णा इंगोले, बळी शेळके, नागनाथ जोगी, शिवाजी कोटे, नरसिंग काळे, गोविंद इंगोले, राम धनेगावे, विठ्ठल आटरगे, संदीप कोनाळे, हसन सय्यद, सत्यवान वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

# अल्पवयीन मुलींचे अपहरण करणाऱ्या तिघांना अवघ्या तासाभरात ठोकल्या बेड्या

**देवणी : शकील मनियार**

लातूर जिल्ह्यात गुन्हेगारीवर प्रभावी आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन सातत्याने सतर्क असून प्रत्येक गुन्ह्यांमध्ये तात्काळ कारवाई करण्यावर विशेष भर दिला जात आहे. त्याच अनुषंगाने पोलीस ठाणे देवणी, जि. लातूर येथील पोलिसांनी अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेणाऱ्या तिघा आरोपींना अवघ्या एका तासाच्या आत ताब्यात घेऊन उल्लेखनीय कामगिरी केली आहे.दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे देवणी येथे गुरनं. ४४/२०२६ अन्वये कलम १३७(२), ३(५) बी.एन.एस.एस. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेल्याची माहिती मिळताच तात्काळ वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली तपास पथक नियुक्त करण्यात आले. पोलीस अधीक्षक लातूर अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण व उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल ढुमे यांच्या सूचनांनुसार आरोपींचा शोध घेण्यासाठी जलद गतीने तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, गुन्ह्यातील आरोपी नामे कलीम हाकानी शेख (२०), अशपाक करीम शेख (२०), बिलाल खालेद कुरेशी (२५), सर्व रा. उदगीर, ता. उदगीर यांनी पिडीत अल्पवयीन मुलीस त्यांच्या ताब्यातील स्काय ब्ल्यू रंगाच्या ईटॉस वाहनातून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने घेऊन जात आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे तात्काळ बीड, छ.संभाजीनगर आणि महामार्ग पोलीस यंत्रणांशी संपर्क साधण्यात आला. बीड ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील पाचोड येथील टोलनाक्यावर नाकाबंदी लावण्याबाबत पोलीस ठाणे पाचोड येथील अधिकाऱ्यांना कळविण्यात आले. तसेच आरोपींचे वर्णन व वाहनाची माहिती संबंधित पोलीस ठाण्यांना देण्यात




आली. या दरम्यान महामार्ग सुरक्षा पथक, बीड येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती मुंढे यांनी संपर्क साधून गुन्ह्यातील तिन्ही आरोपी व पिडीत मुलगी गेवराई येथे ताब्यात घेण्यात आल्याची माहिती दिली. त्यानंतर देवणी पोलीस ठाण्याचे तपासी अधिकारी पोउपनि वऱ्हाडे, सहपोउपनि सय्यद व महिला पोलीस अंमलदार गोपे यांना तात्काळ पोलीस ठाणे गेवराई येथे पाठविण्यात आले. त्यांनी संबंधित आरोपी, त्यांचे ताब्यातील वाहन व पिडीत अल्पवयीन मुलगी यांना ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाईसाठी देवणी येथे आणले. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक लातूर अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण व उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल ढुमे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे देवणीचे सपोनि बी.एस. गायकवाड, पोउपनि वऱ्हाडे, सय्यद, मपोह ७९२ गोपे यांनी तत्परतेने व समन्वयाने पार पाडली. गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि वऱ्हाडे हे करीत आहेत. या घटनेत देवणी पोलिसांनी दाखविलेली वेगवान व समन्वयात्मक कारवाई ही उल्लेखनीय असून अल्पवयीन मुलीचा शोध अल्पावधीत लागल्यामुळे संभाव्य अनर्थ टळला आहे.

# भाईंदरमध्ये अल्पवयीन मुलाने घरातील दागिने चोरून विकले

**मिरा-भाईंदर : वार्ताहर**




भाईंदर पूर्व भागातून एक खळबळजनक घटना समोर आली आहे. जिथे एका १७ वर्षीय मुलाने आपल्याच घरातून सोन्याच्या दागिन्यांची चोरी केली. या प्रकरणी वडिलांनी आपल्या अल्पवयीन मुलाविरोधात नवघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. भाईंदर पूर्वेला रणधीरचंद्र झा (४६) राहतात. डिसेंबर २०२५ ते २१ फेब्रुवारी २०२६ दरम्यान त्यांच्या घरातून सोन्याचे दागिने सातत्याने बेपत्ता होत होते. अखेर तपास केला असता, त्यांचा १७ वर्षाचा मुलगा यानेच हे दागिने चोरून आपल्या ओळखीच्या व्यक्तींना विकल्याचे उघड झाले. त्यांच्या मुलाने घरातून जुन्या बाजार भावाप्रमाणे २ लाख ७१ हजार ५४० रुपये किमतीचे दागिने लंपास केले आहेत. यामध्ये २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, ८ ग्रॅम वजनाचे छोटे मंगळसूत्र, सोन्याची अंगठी, सोन्याचे टॉप्स आणि बाली, सोन्याचे ब्रेसलेट या दागिन्यांचा समावेश आहे. आपल्याच मुलाने अशा प्रकारे फसवणूक केल्याने हतबल झालेल्या वडिलांनी अखेर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. मुलाने चोरीचे दागिने कोणाला विकले आणि यामागे आणखी कोणाचा हात आहे का, याचा तपास आता पोलीस करत आहेत. या प्रकरणाचा अधिक तपास नवघर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार संतोष पाटील करत आहेत.

## पालघरमध्ये 'खासदार आपल्या दारी' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

# जनता दरबारात ८० अर्जांवर तात्काळ कार्यवाही

**वाडा : वार्ताहर**

जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे त्वरित व प्रभावी निराकरण करण्याच्या उद्देशाने खासदार आपल्या दारी-जनता दरबार या उपक्रमाचे आयोजन पालघर लोकसभेचे खासदार डॉ. हेमंत विष्णु सवरा यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी करण्यात आले होते. तलासरी पंचायत समिती सभागृह येथे सकाळी जनता दरबार पार पडला. या माध्यमातून नागरिकांना थेट खासदारांसमोर आपल्या तक्रारी, सूचना व अपेक्षा मांडण्याची संधी उपलब्ध झाली होती. तलासरी येथील जनता दरबारात विविध विभागांकडून एकूण ८० अर्ज प्राप्त झाले होते. पंचायत समिती तलासरी - ४२, तहसील कार्यालय, तलासरी-१६, तालुका कृषी अधिकारी, तलासरी-२, नगरपंचायत तलासरी -२, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (MSEDCL), तलासरी-४, वनविभाग-१, सार्वजनिक बांधकाम विभाग, तलासरी-४, राष्ट्रीय महामार्ग-२, उप विभागीय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी - ४, लघु पाटबंधारे विभाग-१, दुग्ध प्रकल्प




दापचरी-२, अशा एकूण ८० अर्जांवर तात्काळ कार्यवाही करण्यात आली. जनता दरबारात संबंधित शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या प्रश्नांवर तत्काळ कार्यवाही करण्यात आली. अनेक प्रकरणांमध्ये त्वरित निर्देश देण्यात आले असून उर्वरित प्रकरणांवर प्राधान्याने कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पारदर्शक प्रशासन, थेट संवाद आणि विकासाभिमुख निर्णयप्रक्रिया यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला. जनतेच्या सक्रिय सहभागामुळे प्रशासन अधिक जबाबदार व परिणामकारक बनत असून विकासकामांना गती मिळत आहे. भविष्यातही अशा उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. सदर प्रसंगी तलासरी चे तहसीलदार अमोल पाठक, भाजपा अध्यक्ष तलासरी विवेक करमारे, पोलीस निरीक्षक अजय गोरड, प्रदेश पदाधिकारी धर्मा गोवारी, सुरेश शिंदा, सरचिटणीस सुभाष हाडळ, उपाध्यक्ष प्रवीण कापडी, विजय अकरे, मा. पं.स सदस्य प्रकाश सांबर, मा. सरपंच लुईस काकड, सचिव पांडुरंग करमोडा, कोषाध्यक्ष सुनील मासमार, विष्णु काकड आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पालघर जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या अध्यक्षपदी कॅथरीन फेलिक्स परेरा यांची निवड

**वसई : वार्ताहर**



महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या पालघर जिल्हा अध्यक्षपदी वसई तालुक्यातील कॅथरीन फेलिक्स परेरा यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. संघटनेचे सरचिटणीस रामराव वऱ्हाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही अधिकृत घोषणा केली. सोलापूर येथे २३ फेब्रुवारी रोजी राज्य अध्यक्ष शिवानंद भरले यांच्या अध्यक्षतेखाली आणि संघटनेचे नेते विजय बहाकर यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे कार्यकारी मंडळ सभा व आजीव सभासद अधिवेशन उत्साहात संपन्न झाले. या अधिवेशनात विविध जिल्ह्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. यामध्ये पालघर जिल्ह्याची धुरा अनुभवी कार्यकर्त्या कॅथरीन परेरा यांच्याकडे सोपवण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. यावेळी राज्य उपाध्यक्ष म्हणून उस्मानाबादचे बिभीषण पाटील, तर सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी धनाजी शिवराम मुळे यांची निवड करण्यात आली. या प्रसंगी राज्य संघटनेचे कार्याध्यक्ष गोपाळ आगीवाले, हरिभाऊ निसरड, शंकरराव सावंत, रमेश गायकवाड, सोमनाथ शेटे यांसह राज्यभरातील पदाधिकारी आणि हजारो आजीव सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कॅथरीन परेरा यांच्या निवडीमुळे पालघर जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकांच्या प्रश्नांना अधिक ताकद मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यांच्या या निवडीबद्दल जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रातून आणि शिक्षक संघटनांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक ११८ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी, पालघर-बोईसर रोड, पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील **मजूर कामगार सहकारी संस्था** यांच्याकडून मागवित आहेत. खालील कामांकरीता **'बी-१'** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदर निविदा सूचनेमध्ये एकूण **०१ (एक)** काम समाविष्ट आहेत.

टिप : या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.pwd.maharashtra.gov.in 2) http://mahatenders.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये लक्ष (रुपये) जी.एस.टी.वगळून | अंदाजित रक्कम रुपये लक्ष (अक्षरी) जी.एस.टी.वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | मौजे गांजे मरलीपाडा रस्ता तयार करणे. ता.जि. पालघर | रु. २०३४८८९/- | अक्षरी रु. विस लक्ष चौतीस हजार आठशे एकोणनव्वद मात्र | डोंगरी विभाग विकास कार्यक्रम ४१६३ |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

वरिल कामाची निविदा उपलब्ध कालावधी - दि. ०२/०३/२०२६ ते दि. ०९/०३/२०२६ पर्यंत

निविदा उघडणे - दि. १२/०३/२०२६ शक्य झाल्यास सकाळी ११.०० नंतर.

जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/१५९२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी,
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) - ४०१ ४०४.
दिनांक : २५/०२/२०२६

सही/-
(म. पां. किणी)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर

जिमाका/पालघर/जाहि २०२/९७/२०२६, दिनांक : २६/०२/२०२६

# भिवंडीत महापौरांच्या पुढाकाराने डीप क्लीन स्वच्छता मोहीमेचा शुभारंभ

**भिवंडी : वार्ताहर**



भिवंडीतील अस्वच्छता व कचऱ्यांचे ढीग हे नेहमीच चर्चेत असतात. भिवंडी पालिका महापौर पदी नारायण चौधरी हे विराजमान झाल्यानंतर त्यांनी शहरातील स्वच्छतेला प्राधान्य दिले आहे. त्यासाठी त्यांच्या पुढाकाराने शहरात डीप क्लीन स्वच्छता मोहीम राबविली जाणार आहे. ज्यामध्ये रस्त्यावरील धूळ माती संपूर्णतः उचलून घेऊन पाणी फवारणी केली जाणार आहे. शुक्रवारी कल्याण नाका वाहतूक शाखा कार्यालय येथून महापौर नारायण चौधरी यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये या उपक्रमाचा शुभारंभ केला गेला. याप्रसंगी शहर अभियंता जमील पटेल, सार्वजनिक स्वच्छता विभाग प्रमुख फैजल तातली, मुख्य स्वच्छता निरीक्षक जे एम सोनवणे, भंडारी व स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते. शहरातील स्वच्छतेला आम्ही प्राधान्य देणार असून त्याच साठी सुरू केलेल्या स्वच्छता मोहिमेद्वारे शहराचा चेहरा मोहरा बदलण्याचा आमचा मनोदय आहे. ज्यामध्ये पालिका कर्मचारी नागरिक या सर्वांचे सहकार्य मोलाचे राहणार आहे. त्यासाठी पावसाळ्या पूर्वी होणारी नालेसफाई यावेळी मार्च महिन्यातच सुरू केली जाणार असून अंजूर फाटा ते कल्याण नाका या रस्ता रुंदीकरण झालेल्या रस्त्याचे डांबरीकरण केले जाईल असा विश्वास महापौर नारायण चौधरी यांनी व्यक्त केला आहे.

क्राईम संध्या | सोमवार दि. २ मार्च २०२६ ते रविवार दि. ८ मार्च २०२६ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ५

# पुण्याच्या विनाशाकडे नेणाऱ्या मेट्रो आणि बोगदा प्रकल्पांना कडाडून विरोध

## निवृत्त कर्नल सुरेश पाटील यांचा प्रशासनाला इशारा




**पुणे : वार्ताहर**

पुणे शहराच्या नियोजनाच्या नावाखाली सुरू असलेले अवाढव्य मेट्रो प्रकल्प आणि खडकवासला ते फुरसुंगी दरम्यानचा प्रस्तावित बोगदा हे प्रकल्प सामान्य नागरिकांच्या हिताचे नसून शहराचा विनाश करणारे आहेत, असा गंभीर आरोप ग्रीन थम्सचे संस्थापक अध्यक्ष निवृत्त कर्नल सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाटील यांनी केला आहे. आज आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी मेट्रो, वाहतूक कोंडी आणि पाणी प्रश्नावर प्रशासनावर कडक शब्दांत ताशेरे ओढले. यावेळी बोलताना निवृत्त कर्नल सुरेश पाटील यांनी खालील प्रमुख मुद्दे मांडले.

**मेट्रोप्रकल्प की काँक्रीटचे जंगल?**

आज जगभरात एलआरटी (LRT) आणि चीनसारख्या देशांत जमिनीवरून धावणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत असताना, पुण्यात मात्र अवाढव्य बांधकामे आणि प्लॅटफॉर्म उभारले जात आहेत. मेट्रोच्या दोन्ही बाजूंना ५० मीटरपर्यंत ४ एफएसआय (FSI) देऊन जिथे बंगले होते तिथे टॉवर्स उभे केले जात आहेत. यामुळे एका स्कूटरच्या जागी आता शेकडो वाहने येतील, ज्यामुळे वाहतुकीचा प्रश्न सुटण्याऐवजी अधिक जटील होईल.

**३२ कि.मी.चा बोगदा हा 'मूर्खपणा'**

खडकवासला धरणापासून फुरसुंगीपर्यंत दीड-दोन टीएमसी पाणी वाचवण्यासाठी ३२ किलोमीटरचा बोगदा कशासाठी? असा प्रश्न त्यांनी विचारला. त्याऐवजी धरणातील गाळ (माती) काढला तर साठवण क्षमता वाढेल आणि ती माती शेतकऱ्यांना दिल्यास त्यांचे उत्पन्न चौपट होईल. या बोगद्यातून निघणारा प्रचंड मलबा टाकायचा कुठे, याचे उत्तर प्रशासनाकडे नाही.

**कालव्यालगतचे रस्ते खुले करा**

पुण्यातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून कालव्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या जागांचा वापर दुचाकींसाठी (टू-व्हीलर) रस्ता म्हणून करावा. हे रस्ते मोकळे केल्यास वाहतुकीचा मोठा भार हलका होईल, मात्र प्रशासन या जागांकडे दुर्लक्ष करून तिथे कचरा साचू देत आहे, ही खेदाची बाब आहे.

**पाण्यासाठी रडणारी जनता आणि एसीमधील अधिकारी**

पुण्याला आपण 'विद्येचे माहेरघर' म्हणतो, पण आज पुण्यात टँकरराज सुरू आहे. गरीब महिला पाण्यासाठी मैलोन्मैल भटकत आहेत आणि दुसरीकडे अधिकारी एसी ऑफिसमध्ये बसून लाखो रुपये पगार घेत आहेत. ७० टक्के जनतेला पाणी मिळत नाही, हे प्रशासनाचे मोठे अपयश आहे.

**प्रशासनाला आवाहन**

पत्रकार बंधूंनी या प्रश्नावर आयुक्तांना आणि पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारावा. मेट्रोचे प्लॅटफॉर्म आणि हे चुकीचे प्रकल्प थांबवले पाहिजेत. पुढच्या पिढीसाठी आपण एक चांगले आणि राहण्यायोग्य शहर सोडले पाहिजे, असे कळकळीचे आवाहन निवृत्त कर्नल सुरेश पाटील यांनी शेवटी केले.

# राजमाता जिजामाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे 'एनएमएमएस' परीक्षेत यश



**लातूर : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत येथील राजमाता जिजामाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखली असून सात विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. महेश बाळासाहेब मस्के हा विद्यार्थी ११० गुण मिळवत विद्यालयात प्रथम, हर्ष बालाजी कांबळे १०८ गुण मिळवत द्वितीय तर अदिती अविनाश लवटे ही १०२ गुण मिळवून विद्यालयात तृतीय आली आहे. या परीक्षेत अद्वैत अन्शीराम बल्लाळ याने ८६ गुण, सार्थक धनराज कराड ८१, तर साईनाथ दत्ता गोरे व अंकिता अमोल कंठाळे यांनी प्रत्येकी ७८ गुण मिळवत शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्र्वर केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अमियवनी केंद्रे, वैशाली केंद्रे, पर्यवेक्षक एस.एम. गुरमे, पांडुरंग कुलकर्णी, मदन धुमाळ यांच्यासह अन्य शिक्षकांनी शाल, पुष्पहार देऊन कौतुक केले.

# एक चारचाकी वाहन, दोन मोटारसायकलींसह शेळ्या चोरीचे १८ गुन्हे करणारी टोळी जेरबंद



**सोलापूर : इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात वाढत्या शेळ्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप यांना सूचना देत अशा गुन्ह्यांवर प्रभावी आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे आदेश दिले होते. पोलीस निरीक्षक संजय जगताप यांनी त्यांचे अधिपत्याखाली सर्व टीमना रात्रीच्या गस्तीत वाढ करणे, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या संशयितांवर लक्ष ठेवणे, गुप्त माहितीदारांचे जाळे सक्रिय ठेवणे तसेच जिल्ह्याच्या सीमेवर पेट्रोलिंग वाढविणे अशा स्पष्ट सूचनाही त्यांनी दिल्या होत्या. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप यांनी पथक गठीत करून सहायक पोलीस निरीक्षक पाटील व त्यांच्या टीमला सुचना दिल्या आदेशाप्रमाणे तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी आणि गुप्त माहितीच्या आधारे तीन इसम एक चारचाकी गाडी व दोन मोटारसायकल घेऊन मोहोळ-पोखरापुर रोडवर थांबली असल्याचे गोपनीय बातमीदार यांनी माहिती दिली त्यावरून सहायक पोलीस निरीक्षक भिमगोंडा पाटील यांच्या टीमने वरिल तीन इसमांना वाहनांसह ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या इसमाकडे प्राथमिक चौकशी केली असता त्यांनी सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर, सोलापूर तालुका या भागांत शेळ्या व मोटारसायकल चोरीचे १८ गुन्हे केल्याची कबुली दिल्याने आरोपीस पुढील तपास कामी मोहोळ पोलीस ठाणे येथे जमा केले आहे. या यशस्वी कारवाईमुळे ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदरची कामगिरी पोलीस निरीक्षक संजय जगताप यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक भिमगोंडा पाटील, पोलीस उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के, सपोफो. प्रकाश कारटकर, पोहवा सलीम बागवान, विजय भरले, शशी कोळेकर, विरेश कलशेट्टी, धनराज गायकवाड, पोलीस कॉन्स्टेबल सागर ढोरे पाटील, प्रमोद शिंपाळे, समर्थ गाजरे, यश देवकते, योगेश जाधव, राहुल दोरकर, हरीष थोरात व चालक दिलीप थोरात यांनी केली आहे.

# श्रीरामपूर नगरपालिका हद्दीतील ४० ते ४५ वर्षापासून राहत असलेले रहिवाशांना नोटीसाद्वारे घरे खाली करण्यास मज्जाव




**पुणे : शंकर जोग**

श्रीरामपूर नगरपालिका हद्दीतील प्रवरा डावा कालवा परिसरातील ४० ते ४५ वर्षांपासून राहत असलेले तसेच सर्व रहिवासी पुरावे असलेल्या हजारो परिवारास बेलापूर रोड सिंचन शाखा श्रीरामपूर यांनी घरी खाली करण्या संदर्भात दिलेल्या अन्यायकारक नोटीसाविरोधात ॲड. राजेश भारस्कर यांच्या नेतृत्वात श्रीरामपूर येथे महात्मा गांधी पुतळा या ठिकाणी आमरण उपोषण सुरुवात केली आहे. श्रीरामपूर नगरपालिका हद्दीतील प्रवरा डावा कालवा परिसरात सुमारे ३००० ते ४००० परिवार गेले ४० ते ४५ वर्षापासून राहत असून दहा ते बारा हजार व्यक्तीजवळ सण १९८० पासून मतदान कार्ड. रेशनिंग कार्ड, दाखले सहित सर्व शासकीय व स्थानिक पुरावे उपलब्ध असतानाही शाखा अधिकारी बेलापूर रोड सिंचन शाखा श्रीरामपूर या कार्यालयाने स्थानिक रहिवाशांना अगदी दहा ते बारा दिवसाच्या मुदतीच्या अन्यायकारक नोटीस देऊन घरी खाली करण्यास सांगितले आहे. सिंचन शाखा बेलापूर कार्यालयाने दिलेल्या या अन्यायकारक नोटीस विरोधात ॲड. राजेश भारस्कर यांच्या नेतृत्वात स्थानिक सर्व परिवारांनी महात्मा गांधी पुतळा या ठिकाणी आमरण उपोषण सुरुवात केली आहे. गेले ४० ते ४५ वर्षापासून राहत असलेल्या सर्व रहिवाशांना दिलेल्या अन्यायकारक नोटीसा त्वरित रद्द करण्यात याव्यात. नागरिकांचे घरी त्वरित नियमित करण्यात यावीत या मागण्या ॲड. राजेश भारस्कर व स्थानिक रहिवाशांच्या वतीने करण्यात आले आहे. या आंदोलनास श्रद्धा बर्वे. सामाजिक कार्यकर्ते नितीन बालकी, पत्रकार मनोज खोपडे, पत्रकार शंकर जोग यांनी मार्गदर्शन करून सहकार्य केले.

# वाड्यात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा



**वाडा : वार्ताहर**

वि.वा.शिरवाडकर म्हणजेच कुसुमाग्रज हे मराठी भाषेतील अग्रगण्य लेखक, समीक्षक, नाटककार, कथाकार व कवी होते. ते मराठी साहित्यातील ज्ञानपीठ पुरस्कार मिळाविणारे दुसरे साहित्यिक होते. त्यांचा जन्म २७ फेब्रुवारी १९१२ रोजी झाला होता, म्हणून हा दिवस मराठी राजभाषा दिन किंवा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. कुसुमाग्रज यांच्या वाढदिवसानिमित्त देशभर मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जात असताना वाड्यातही विविध ठिकाणी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करून हा दिवस उत्साहात साजरा केला. वाड्यातील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर येथील विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रज यांचा जीवनपट उलघडणारे भाषण केले तर शिक्षकांनी त्याला मार्गदर्शन केले वाडा आगारात आगार व्यवस्थापक भूषण बेंद्रे व कर्मचाऱ्यांनी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तर वाडा बस स्थानकात एस.टी.चे कर्मचारी प्रवासी व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून अभिवादन केले. वाड्यातील शंभर वर्ष पूर्ण झालेल्या महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयात वाचकांसाठी नव नवीन मराठी पुस्तके उपलब्ध करून दिली होती. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी टपाल कार्यालय, विविध बँक कर्मचारी, नगरपंचायत कर्मचारी व नागरिकांना गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा दिल्या.

# पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांचा आढावा बैठक



**सोलापूर : इरप्पा बोरीकरजगी**

विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर यांनी संवाद हॉल पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण येथे आढावा बैठक घेतली बैठकीमध्ये मागील वर्षातील गुन्ह्यांचा आढावा घेतला व मागील वर्षातील गुन्ह्यांचा तसेच कायदा सुव्यवस्था परिस्थितीचा आढावा घेऊन मार्गदर्शन केले. सोलापूर ग्रामीण पोलीस दलासाठी शासनाकडून मिळालेल्या एकूण चार नवीन फॉरेन्सिक व्हॅनचे सेवार्पण विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी व एम रामकुमार पोलीस आयुक्त सोलापूर शहर यांचे हस्ते झाले. तसेच सोलापूर आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून नैसर्गिक आपत्तीच्या कालावधीमध्ये आवश्यक असणारे आपत्ती व्यवस्थापन किटचे पोलीस विभागास वाटप करण्यात आले. यावेळी प्रत्येक गुन्ह्याच्या घटनास्थळावरील महत्त्वाचे पुरावे घेऊन ते आहे त्या स्थितीत तपासणीसाठी पाठवण्यात येणार असल्यामुळे पुढील काळामध्ये गुन्ह्यांच्या दोषसिद्धीमध्ये वाढ होणार असून नागरिकांना न्याय मिळणार आहे असे मान्यवरांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमासाठी अतुल कुलकर्णी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, प्रीतमकुमार यावलकर अपर पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण व सोलापूर ग्रामीणचे सर्व सहाय्यक पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी सर्व शाखांचे प्रभारी अधिकारी व स्टाफ उपस्थित होता.

# एनएमएमएस परीक्षेत श्री योगेश्वरी देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय देवणीचे घवघवीत यश



**देवणी : वार्ताहर**

देवणी येथील श्री योगेश्वरी देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आठवी वर्गासाठी असलेल्या एन.एम.एम.एस.या परीक्षेलाएकूण १९ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २ विद्यार्थी १) सूर्यवंशी वैष्णवी अंकुश ७९ तर २) कलवले हिमांशू मारुती ७४ गुण घेऊन उत्तीर्ण झालेले आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशाबद्दल विशेष कौतुक करण्यात आले. शाळेचे संस्थापक माजी प्राचार्य यशवंतराव पाटील, संस्थेचे सचिव अभिजीत पाटील, संस्थेचे अध्यक्ष आदित्य पाटील, प्राचार्य श्री हरकंचे आर.एम. तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करन्यात आला व त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस पालक वर्ग शिक्षक पत्रकार विविध क्षेत्रातील मान्यवर शुभेच्छा दिल्या आहेत.

# देवणी नगरपंचायतीच्या सफाई महिला कामगाराचे ठिय्या आंदोलन लेखी आश्वासननंतर अखेर माघार



**देवणी : वार्ताहर**

देवणी येथील नगरपंचायत मधील सफाई कामगाराचे नऊ महिन्या पासून थकित पगार देण्यात यावा व कामावर रुजू करून घ्यावे या प्रमुख मागणी करिता नगरपंचायतीसमोर ठिय्या आंदोलन करण्यात येत होते. यावेळी महिला कामगारांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. याबाबत देवणी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष लोमटे यांनी दिलेल्या लेखी पत्रान्वये उपोषणकर्त्यांनी आपले उपोषण माघार घेतले. या पत्रामध्ये असे सांगितले आहे की, देवणी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत देवणी शहरातील नालेसफाई, रस्ते झाडणे व कचरा संकलन करणे, विलगीकरण करणे, प्रक्रिया करणे व त्याचा पुनः वापर करणेबाबत ई निविदा दि. २४/०२/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून त्यांची अंतीम तारीख ०३/०३/२०२६ असून त्यानंतर निविदा अंतीम झाल्यानंतर तात्काळ कंत्राटदार मार्फत आपल्या सर्वांना कामावर घेण्यात येईल. तसेच सदरील कामावर घेतलेल्या कामगारा वर कुठल्याही बाहेरील व्यक्तीचा हस्क्षेप राहणार नाही सदरील कामगारांना स्वच्छता निरिक्षक यांच्या देखरेख खाली कामे करुन घेण्यात येईल. तसेच आपले थकीत पगार हे कंत्राटदार मार्फत मार्च अखेर अदा करण्यात येईल. सध्यास्थितीत स्वच्छते बाबत निविदा अंतीम न झाल्यामुळे देवणी शहरात स्वच्छता कामे ही कोणत्याही बाहेरील कामगार यांना घेण्यात येणार नाही व त्याचे देयक नगर पंचायतीमार्फत अदा करण्यात येणार नाही, अशा लेखी आश्वासनानंतर उपोषण माघार घेण्यात आले.

# खानिवली ग्रामपंचायतीचा सत्कार



**वाडा : वार्ताहर**

माझी वसुंधरा अभियान ४.० आणि ५.० मध्ये राज्यस्तरीय व विभागस्तरीय सर्वोत्तम कामगिरी केल्याबद्दल पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते वरळी डोम येथे ग्रामपंचायत खानिवलीला पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाला राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पंकजा मुंडे, राज्याचे मुख्य सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे सचिव जयश्री भोज, अभियान संचालक सुधाकर बोबडे आदी उपस्थित होते. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी वाडा गटविकास अधिकारी वैभव शिंदे, विस्तार अधिकारी वसंत अहिरे, सरपंच भरत हजारे, उपसरपंच सागर पाटील, ग्रामपंचायत अधिकारी शशिकांत ठाकरे,तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी पंकज चौधरी, ग्रामपंचायत सदस्य प्रेरणा पोटिंदा, सारिका पाटील, रमेश डुकले, निकिता वाघ, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, ग्रामरोजगार सेवक, पेसा मोबिलायजर, ग्रा.पं.कर्मचारी उपस्थित होते.

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई यांचे कार्यालय**
**(महसूल शाखा)**
किल्लाबंदर रोड, मालोंडे, वसई गांव, ता. वसई, जि. पालघर, पिन नं. ४०१ २०१
दुरध्वनी क्रमांक : (०२५०) २३२२००७

क्र.मशा/कक्ष-१/फौजदारी/कावि-०२/२०२६
दिनांक : २७/०२/२०२६

**जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक : ०२/२०२६
**श्री. राजू वर्मा** .... **अर्जदार**

**विरुद्ध**

**१) सहा. आयुक्त,**
**वसई-विरार शहर महानगरपालिका, ता.वसई, जि.पालघर** .... **सामनेवाले**

ज्याअर्थी वरील अर्जदार त्यांची मुलगी **कु.पल्लवी राजू वर्मा** हिचा जन्म दिनांक २२/११/२००९ रोजी नालासोपारा, ता. वसई, जि. पालघर येथे झाला असून तिच्या जन्माची नोंद करण्याबाबत आदेश मिळण्याकरीता या कार्यालयात अर्ज क्रमांक ०२/२०२६ दाखल केलेला आहे. ज्या कोणी इसमास हरकत असेल त्यांनी या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी हरकत करावी. सदरहू आदेश देण्याबाबत जर कोणत्याही इसमाची हरकत दाखल न झाल्यास योग्य ते पुरावे व कागदपत्र घेवून अर्जदार यांना जन्माची नोंद करण्याबाबत आदेश देण्यात येईल यांची कृपया नोंद घेण्यात यावी.

आज दिनांक २७/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

सही/-
**तहसीलदार वसई करिता**

02 TO 08 MARCH 2026 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 2/28/2026 8:57 PM Page 1



# अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**वसई : वार्ताहर**




वसई येथील अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयचा मराठी विभाग व मराठी वा मंडळातर्फे, महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या समन्वयाने शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार शेळके, डॉ. दीपा मुर्डेश्वर कत्रे, विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मराठी विभागप्रमुख डॉ. फड यांनी प्रास्ताविकात मातृभाषेविषयीचे प्रेम व्यक्त करत भाषा ही आई आहे या भावनेवर भर दिला. नियमित वाचनाची सवय, साहित्याचे संस्कारमूल्य आणि भाषिक अभिव्यक्तीचे महत्त्व याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार शेळके यांनी उपस्थितांना मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा देत मराठीच्या विद्यार्थ्यांना भाषासंवर्धनाची जबाबदारी समजावून सांगितली. मराठी वृत्तपत्रांचा वाचकवर्ग व दृकश्राव्य तसेच डिजीटल माध्यमांचा वाढता प्रभाव, अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम म्हणून मराठीची भूमिका, अनेकांना मातृभाषेविषयी असणारा न्यूनगंड आणि शासनाच्या भाषासंबंधी निर्णयांचा संदर्भ देत त्यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे मराठी भाषेचा गौरव व्यक्त केला. वैभवी मोरे व प्राची कदम यांनी मराठी अभिमानगीत सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. श्रद्धा मटकर यांनी कुसुमाग्रज यांचा परिचय करून दिला. जान्हवी मांजरेकर, रुखसार खान, समीक्षा पाटील, प्रगती डोईफोडे, योगेश नरवडे, चेतना चव्हाण, काजल गायकवाड आणि युक्ता बांबर्डेकर यांनी कविता, भाषणे व विचारमंथनातून मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले. याशिवाय वारली लोकगीत विंचू चावलाय बोटी' वैभवी मोरे यांनी सादर केले, तर आगरी लोकगीत आगीनगारी बोलतंय बेगीनगारी' प्रा. वरुणा भोईर यांनी सादर करून कार्यक्रमात लोकसंस्कृतीचा रंग भरला. प्रा. डॉ. सखाराम डाखोरे यांनीही काव्यसादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. सूरज निकम या विद्यार्थ्याने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर अंजली चव्हाण या विद्यार्थिनीने आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमाचे नियोजन, समन्वयन आणि कार्यान्वयन विद्यार्थ्यांनी प्रा. डॉ. सखाराम डाखोरे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

दरम्यान दुपारच्या सत्रात अण्णासाहेब वर्तक कनिष्ठ महाविद्यालय येथेही मराठी भाषा गौरव दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दुपारी २.०० वाजता आयोजित कार्यक्रमात अभंग, समूहगीत, मराठी नाट्याभिनय तसेच पोवाडा यांचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. शैलेश औटी (मराठीचे प्राध्यापक व आकाशवाणी मुंबईचे वृत्तनिवेदक) उपस्थित होते. पर्यवेक्षिका डॉ. भारती तोरणे व उपप्राचार्य हेमंत डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. संपूर्ण कार्यक्रम उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडला. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये मातृभाषेबद्दल अभिमान व जिव्हाळा वृद्धिंगत करण्याचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला.

## जागतिक मुद्रण दिवस व मराठी भाषा गौरव दिवसाच्या निमित्ताने नंदाखाल चर्चच्या प्रांगणात पुस्तक प्रदर्शन

**विरार : वार्ताहर**

२४ फेब्रुवारी हा जागतिक मुद्रण दिवस व २७ फेब्रुवारी हा मराठी राजभाषा दिवस याचे औचित्य साधून वाचन संस्कृती वाढावी म्हणून नंदाखाल येथील फा. पॉलिकार्प सिनियॉर ग्रंथालयातील पुस्तकांचे प्रदर्शन विरार पश्चिमेला नंदाखाल चर्चच्या प्रांगणात भरविले होते. १४ व १५ फेब्रुवारी असे सलग दोन दिवस प्रदर्शन सुरु होते. प्राचार्य फा. प्रदीप डाबरे, फा. सालोमन रॉड्रिग्ज. फा. ब्रायन तसेच उपमहापौर मार्शल लोपीस व नगरसेवक डॉमणिक रुमाव यांनी प्रदर्शनाला सदिच्छा भेट दिली. लोकांनी पुस्तके पाहावीत, चाळावीत आणि पुस्तकांशी मैत्री करावी हा प्रमुख हेतू होता. या दोन दिवशी शेकडो लोकांनी ग्रंथप्रदर्शनाला भेट दिली. अनेक लोक ग्रंथालयाचे नवीन सभासद झाले, अशी माहिती ग्रंथालय प्रमुख न्थनी परेरा यांनी दिली. या प्रसंगी मुद्रण कलेचे जनक गुटेनबर्ग व कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या आठवणी जागविल्या. नंदाखालची शिक्षक संघटना व ग्रंथालय प्रमुख यांनी खूप मेहनत घेतली. विद्यार्थ्यांचे सहकार्यही लाभले. नंदाखाल चर्चचे प्रमुख धर्मगुरु फा. डॉमणिक डिआब्रियो, प्राचार्य फा. विजय लोबो यांचे मोलाचे सहकार्य लाभले. जागतिक मुद्रण दिवस व मराठी भाषा गौरव दिवसाच्या निमित्ताने पुस्तक प्रदर्शन भरवून ते यशस्वी करण्यासाठी ग्रंथालय सेवक बॅप्टिस्ट मच्याडो व ॲन्थनी परेरा यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरून....

### वसई-विरार आयुक्तालय परिसरात...

वाढलेली आहे. त्यानंतर पुढे नायगाव, नालासोपारा, वसई, विरार इथल्या गुन्हेगारीच्या आलेखाने स्थानिकांची झोप उडवली आहे. युपी-बिहार मधून आलेले गुन्हेगारी प्रवृतीचे लोक नायगाव, नालासोपारा आणि काही प्रमाणात विरारमध्ये आहेत, तर मुंबईतून खोल्या विकून आलेल्या लोकांनी विरारचा ताबा घेतलाय. त्यातील बरचसे लोक गुन्हेगारी प्रवृतीचे आहेत. वसई-विरारमध्ये कौटुंबिक वादातून खुनाच्या अनेक घटना घडल्या आहेत. तर बलात्कार आणि विनयभंग हे तर रोजचे झालं आहे. पोलीस मात्र काही घडलेलेच नाही अशा अविर्भावात शांत आहेत. नालासोपाऱ्यातील गुन्हेगारीने कळस गाठलाय त्याची अनेक उदाहरणे आहेत. याच वर्षात काही खुनाच्या घटना घडल्यात टाकीपाडा भागात एका मनोरुग्ण भावाने बहिणीचा शिरच्छेद केला. तसेच मधे पडलेल्या आईवरही वार केले, तर प्रगतीनगर येथे पत्नीच्या व्हॉट्सअॅपवर अश्लील कॉमेंट्स करणाऱ्याला जाब विचारायला गेलेल्या पतीची हत्या करण्यात आली. त्या अगोदर संतोष भवन येथे एका महिलेने आपल्या मुलीची हत्या केली. वसई विरारमध्ये चोऱ्या हाणामाऱ्या, बलात्कार हे तर नित्याचेच झाले आहे आणि याला जबाबदार अर्थातच पोलीस आणि गृहखाते सांभाळणार फडणवीस आहेत. निवडणुकीत प्रचारासाठी येणाऱ्या फडणवीस यांनी मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयात येऊन कधीही इथल्या परिस्थितीचा आढावा घेतला नाही. त्यामुळे पोलीसही गांभीर्याने काम करीत नाहीत, त्यामुळे गुंड इतके मास्तवले आहेत कि त्यांची पोलिसांवर हल्ले करण्यापर्यंत मजल गेली. त्यामुळे जिथे पोलिसाच सुरक्षित नाहीत तिथे सामान्य जनतेचे काय? असे इथले लोक म्हणत आहेत. आतापर्यंत या पोलीस आयुक्तलयात सदानंद दाते, मधुकर पांडे, निकीत कौशिक असे तीन आयुक्त झाले पण एकही आयुक्ताला इथल्या गुन्हेगारीवर नियंत्रण करता आले नाही. याचे गाऊंड लेव्हलला काही वेगळेच सुरु आहे. पोलीस क्रिमिनल भाई भाई मिल बाटकर खायेंगे चिंता नाही हीच परिस्थिती इथल्या १९ पोलीस ठाण्यांमध्ये आहे. त्यामुळे अन्याय् झालेल्यांना न्याय मिळत नाही. परिणामी लोक कायदा हातात घेतात, त्यातून गुन्हेगारी अधिक वाढते. गृहमंत्री हे पूर्णवेळ राजकारणी असल्याने पोलीस खात्यात आणि खास करून मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयात काय चाललेय याची त्यांना कल्पना नाही. कल्पना असले तरी लक्ष देण्याची मानसिकता नाही, त्यामुळे इथली कायदा आणि सुव्यवस्था रामभरोसे आहे असेच दिसत आहे, असे लोकांचे मत आहे.

### संपत्तीचा वाद नात्यासाठी काळ...

बहीण हे स्वतंत्र राहत होते, तर भाऊ आणि वडील वेगळे राहत असल्याची माहिती मिळाली आहे. आज संध्याकाळी झालेल्या जोरदार वादानंतर हा सर्व प्रकार घडला. भद्रावती पोलिसांनी या प्रकरणी आरोपी भावाला अटक केली असून वडिलांना देखील ताब्यात घेतलं आहे. घटनेचा पुढील तपास भद्रावती पोलीस करीत आहे.

### चारित्र्याच्या संशयावरून दोघांमधील...

म्हणून त्याच्या मागे लागलेली होती. आपली पत्नी बाहेर परपुरूषाच्या नादी लागली असलच्या संशय कलमेश याला असल्याने तो काही आपली वडिलार्जीत शेती आणि घर तिच्या किंवा मुलगा किरण याच्या नावे करण्यास तयार नव्हता. यातून नवरा बायकोची भांडणे विकोपाला गेली. पै-पाहुण्यांनी आणि कस्तुरीच्या माहेरच्या लोकांनी ही त्याच्या भांडणात बऱ्याच वेळेला मध्यस्थी करून त्यांची भांडणे मिटविण्याचा प्रयत्न केला परंतु काही केल्या त्याची भांडणे मिटत नव्हती. नवरा आपल्या चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करीत असल्याने कस्तुरी हिने गेल्या दहा बारा वर्षापूर्वीच मुलगा किरण याला घेऊन आपले माहेर तुरघट येथे राहयला गेली. ती गेल्या दहा बारा वर्षापासून माहेरीच राहत होती. माहेरी राहून देखील ती नवऱ्याला संपत्तीच्या वादातून त्रास देत होती. शेती आणि घर आपल्या नावावर करण्याचा हट्ट धरून तिने या संदर्भात नवऱ्याच्या सासुच्या विरोधात कोर्टात केस घातली होती. कलमेश हा आपली वडिलार्जीत प्रॉप्रटी तिच्या नावावर करण्यास काही केल्या तयार नव्हता. त्याला आपल्या वयोवृध्द आईची काळजी वाटत होती. तसे त्याची काळजी काही चुकींची ही नव्हती. कारण बायकोवर विश्वास तरी कसा ठेवायचा कारण ती परपुरूषाच्या नादाला लागूनच तिच्या माहेरी गेल्या दहा बारा वर्षांपासून राहयला लागली होती. बायकोला आपली किंवा आपल्या आईची जरा ही काळजी वाटत नाही याची त्याला खात्री झालेली होती. त्यामुळे तो काही तिचे ऐकायला किंवा ती सांगेल तसे करायला तयार नव्हता. कस्तुरीला वाटत होते की नवरा कलमेश हा दारूच्या व्यसनाच्या पायी शेती आणि घर विकुन खाईल आणि आपल्याला व मुलग्याला वाऱ्यावर सोडेल अशी भिती वाटत होती. परंतु तसे करण्यातील कलमेश हा नव्हता. घरच्या कटकटीच्या कारणातूनच तो तुमकुर येथे गेल्या दहा बारा वर्षापासून कामाला होता. या दरम्यान त्याने पत्नी कस्तुरी आणि मुलगा किरण याला बऱ्याच वेळेला आपली गावी म्हणजे हिरेनंदीहळ्ळी येथे येवून राहा आपली भांडणे मिटवून घेऊया असे सांगितले, परंतु हट्टी आणि जिद्दी कस्तुरीने आपला हेका कायम ठेवत आधी शेती आणि घर आमच्या नावे करा मगच आम्ही गावी हिरेनंदीहळ्ळी येतो असे सांगून त्याच्या प्रस्तावाला तिने वाटण्याच्या अक्षताच लावल्या होत्या. आपली प्रॉप्रटीसाठीच ती आपली आडवणूक करीत आहे हे कलमेशच्या ही लक्षात आले. गेल्या दहा बारा वर्षांपासून ती माहेरी एकटीच राहत आहे याचा अर्थ तीचे काही तरी हितसंबंध तेथे आहेत. माझा संशय खरा आहे तिचे तुरघट येथील एका इसमाशी अनैतिक संबध असून त्या संबंधातून ती तेथे राहत असल्याची माहिती ही कलमेश याला मिळालेली होती. ती ज्या ज्या वेळी प्रॉप्रटीच्या संबंधातून त्याच्याशी भांडण करायला येत होती. त्या त्या वेळी तो तिच्या अनैतिक संबंधाचा मुद्दा पुढे करीत होता. त्यातून त्याची भांडणे मिटत नव्हती. नवरा आपल्या नावे शेती घर करण्यास तयार नसल्याचे बघून कस्तुरीने आता वेगळाच घाट घातला होता. त्यातच तो आपल्यावर संशय घेत आहे याचा राग ही तिला होता. त्यामुळे तिने आपल्या प्रियकराला सांगून नवरा कलमेश याची गेम करण्याचा प्लॅन केला. तिने प्रियकराला सांगितले की, तिचा प्रियकर कलमेश याला मारून टाक असे सांगितले. त्याप्रमाणे कस्तुरीने प्रियकराशी संगनमंत केले. त्यातच कलमेश हा गेल्या दहा बारा दिवसापूर्वी हिरेनंदीहळ्ळी येथे आला असल्याची माहिती कस्तुरीला मिळाली. तिने महेश अंबण्णावर, याला ही माहिती दिली. त्याची ही ओळख कलमेश बरोबर होती. याच ओळखीचा फायदा घेत त्याने कलमेश याला दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी दारूच्या पार्टीसाठी फोन करून बोलावून घेतले. दारूच्या पार्टीसाठी ते हिरेनंदीहळ्ळी येथील गावाच्या बाहेर असणाऱ्या एकाच्या शेतात गेले. तेथे आधीच महेश अंबाण्णावर याचा मित्र मुदकाप्पा कोलेकर हा ही होता. तर तेथेच आधी पासून कलमेश याचा मुलगा किरण हा ही लपून बसला होता. ते तिघे ही दारू पित बसले होते. तिघांना ही दारूची नश जास्तच झाली होती. कलमेश याच्या डोळ्यात दारूची झिंग जास्तच दिसत असताना मुदकाप्पा याने मुद्दामच कलमेश याच्या बायकोचा विषय काढला. महेश आणि मुदकाप्पा याने दोन दिवसात तुझी शेती आणि घर कस्तुरीच्या नावे नाही केलेस तर तुला आम्ही बघून घेतो असे सांगितले. त्यावर दारूच्या नशेत असणाऱ्या कलमेश याने मी काही माझी शेती आणि घर तिच्या नावे किंवा मुलगा किरण याचे नावे करणार नाही आणि तुम्ही मला या संदर्भात विचारणारे कोण? तुम्ही दोघे माझ्या बायकोचे यार आहात काय? मला खात्री होती की तुमच्या दोघा पैकी कोणाबरोबर तरी माझ्या बायकोचे संबंध आहेत. त्यामुळेच तुम्ही मला इथे बोलाविले आहे म्हणत त्याने त्या दोघांना कन्नडमध्ये शिव्या घालायला सुरूवात केली. त्यातच दारुच्या नशेत असणाऱ्या महेश याने माझे तुझ्या बायकोबरोबर संबंध आहेत तु काय करणार असे म्हणत कलमेश याला टोचून बोलले. ते दोघे ही कलमेश याला मारहाण करीत मुदकाप्पा कोलेकर याने आपल्याकडील चाकून कलमेश याच्या अंगावर सपासप असे चार पाच वार केले. त्यासरशी कलमेश हा ओरडत जमिनीवर लोळत राहिला.त्याचवेळी किरण ही तेथे आला. त्याने ही त्या दोघांना कन्नड मध्ये याला सोडू नका मारून टाका असे सांगितले. त्याचवेळी त्याच चाकूने त्या दोघांनी कलमेश याची पॅन्ट खाली करून त्याचे गुप्तांग ही कापून टाकले. कलमेश याचे गुप्तांग कापून टाकल्याने त्याला वेदना सहन होत नव्हत्या. काही क्षणातच तो जागेवरच टाचा घासत गतप्राण झाला. त्याचा आपल्या हातून मृत्यु झाल्याचे बघून त्या तिघांना ही त्याला त्या मक्याच्या शेतात टाकून तेथून पोबारा केला. दोन तीन दिवस या घटनेचा कोणाला काही थांगपत्ता लागला नाही. कलमेश याची वयोवृध्द आई ही तो तुमकुर येथे कामाला गेला आहे असे समजून गप्प राहिली होती. इकडे चार दिवसांनी त्या मक्याच्या शेतात शेत मालक चंद्रशेखर हनमनाळ हे गेले असताना त्यांना कसला तरी कुजलेला वास येवू लागला. त्यांनी पुढे जावून पाहिले असता त्यांना एका इसमाचा कुजत चाललेला मृतदेह दिसून आला. मयत इसमाचे गुप्तांग ही कापलेले दिसत होते. त्यातून मृतदेह हा सडलेला असल्याने त्याचा वास सुटलेला होता. त्यांनी लागलीच या घटनेची माहिती गावातील पाटील यांना दिली. पाटील यांनी घटनास्थळी येवून पाहिले. त्यांनी या घटनेची माहिती कितुर पोलीसांना दिल्यावर पोलीस ही लागलीच घटनास्थळी दाखल झाले. पोलीस उप.निरी. प्रविण जी.जी हंपण्णावर यांनी घटनास्थळी दाखल होत घटनेचा पंचनामा करीत मयत इसमाची ओळख हिरेनंदीहळ्ळी येथील कलमेश कोटी हा असल्याची पटवली. घटना घडून तीन चार दिवस झाले असावेत असा अंदाज पोलीसांनी बांधला. घटनास्थळी जिल्हा पोलीस प्रमुख रामराजन अतिरिक्त जिल्हा पोलीस प्रमुख रामगौंडा बसर्गी, बैलहोंगल विभागाचे डीवायएसपी विरय्या हिरमेठ आणि कितुर पोलीस स्टेशनेचे पो.निरी शिवानंद गुडनट्टी यांनी भेट दिली. कितुर पोलीसांनी या घटनेची माहिती मयत कलमेश कोटी याची पत्नी कस्तुरी आणि मुलगा किरण यांना दिली.ते ही तातडीने घटनास्थळी आले. पोलीसांनी या घटनेची माहिती मयत कलमेश याच्या नातेवाईकाकडून घेऊन तपासाला सुरूवात केली. पंचनामा उरकून मृतदेह पोस्ट मार्टमसाठी कितुर येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस या घटनेचा तपास करीत होते. परंतु घटनास्थळी कोणता पुरावा आढळून आला नसल्याने तपासात अडचणी वाढत होत्या. तपासकामी पोलीसांनी आपले खबरे ही कामाला लावले होते. त्यातच दोन चार दिवसात खबऱ्याच्याकडून पोलीसांना माहिती मिळाली की, मयत कलमेश याच्या घरातच त्याच्या संपत्तीवरून त्याच्या पत्नीशी वाद होत होता. तसेच त्याची पत्नी या कारणातूनच गेल्या दहा बारा वर्षांपासून तिच्या माहेरी राहत होती. तिनेच आपल्या प्रियकराला कलमेश याला मारण्यास चेतावणी दिली होती. ही माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने हालचाल करीत या घटनेतील संशयीत म्हणून पहिल्यांदा कस्तुरी कोटी आणि तिचा मुलगा किरण कोटी यांना ताब्यात घेतले. त्याच्याकडे कलमेश कोटी याच्या हत्येविषयी चौकशी करीत असताना अखेर कस्तुरी कोटी हिने आपला गुन्हा मान्य करीत पती कलमेश याची हत्या आपणच आपला प्रियकर आणि मित्राच्या मदतीने केल्याचे सांगत यात आपला मुलगा किरण याला सामील केल्याचे पोलीसांना सांगितली. तिच्याकडून ही माहिती मिळताच पोलिसांनी लागलीच महेश अंबाण्णावर त्याचा मित्र मुदकाप्पा कोलेकर यांना ही ताब्यात घेतले. त्यांनी ही आपला गुन्हा मान्य केला. या चौघांनी ही आपला गुन्हा मान्य केल्यावर पोलिसांनी या घटनेची फिर्याद शेत मालक चंद्रशेखर हनमनाळ याच्याकडून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कितुर पोलीस ठाण्यात कलमेश शंकऱ्याप्पा कोटी (५०) याच्या हत्येप्रकरणी त्याची पत्नी कस्तुरी कोटी (४४) मुलगा किरण कोटी (२५) महेश मडीवाळप्पा अंबण्णावर (३३) मुद्दकाप्पा पद्मराज कोलेकर (३०) रा.सर्व हिरेनंदीहळ्ळ ता.कितुर याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. या चौघांना ही पोलिसांनी कितुर कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने या चौघांची ही रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलिसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकु आणि मोटार सायकल जप्त केल्या. या घटनेचा तपास पो.निरी शिवानंद गुडनट्टी, पो.उप.निरी, प्रवीण, पो.उप.निरी. जी.जी. हंप्पण्णावर आयएसआय आर.के. गेंजरी, बी.वाय उपरट्टी, आर.एस. शीला, एम.बी.कम्बार ए.एम.चिक्केरी, एम.आर लम्मानी, एस.एम मुरगोड, एस.पी. तिप्पण्णावर, जी.एस. सलीमठ, जे.जी. पाटील, एल.के. कुंभार, एस.ए पाटील यांनी तपास करून संशयतीना ताब्यात घेतले.

### प्रेम केले हाच तिचा मोठा गुन्हा...

लेकीचा गळा आवळला आहे. मुलीची हत्या केल्यानंतर आत्महत्येचा बनाव करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न बापाने केला होता. संशयित आरोपी बापाचा हा प्रयत्न निष्फळ ठरला. वैराग पोलिसांच्या तांत्रिक तपासाने ही ऑनर किलिंगची घटना उघड झाली आणि आरोपी वडिलांना न्यायालयाने २ मार्चपर्यंत कोठडी सुनावली आहे. राजेंद्र लालासाहेब नरसुडे (वय ५४) असं संशयीत आरोपी बापाचं नाव आहे. राजेंद्र नरसुडे याची मुलगी ही बार्शी येथे शिक्षण घेत होती. तिचे कॉलेजमधील एका तरुणाशी मैत्रीपूर्ण संबंध असल्याची कुणकुण वडील राजेंद्र नरसुडे याला लागली. राजेंद्र नरसुडे याने २७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:३० ते १२:३०च्या सुमारास घरातच मुलीचा तिच्याच ओढणीने गळा आवळून हत्या केली. हत्येनंतर पुरावे लपवण्यासाठी त्याने तिला बळजबरीने कीटकनाशक पाजले, मोबाईलमधील चॅट्स डिलीट केल्या आणि धाराशिव रुग्णालयात नेले. धाराशिव येथील डॉक्टरांनी तरुणीला मृत घोषित केले. बार्शी तालुक्यातील वैराग पोलीस ठाण्यात तरुणीची आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. धाराशिव शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांनी शवविच्छेदन केल्यानंतर अहवालात गळा आवळल्याने मुलीचा मृत्यू झाल्याचं स्पष्ट झालं. वैराग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार संदेश पवार यांच्या नेतृत्वात सखोल तपास सुरू झाला. सायबर तज्ज्ञांनी डिलीट डेटा रिकव्हर करत संशय बळकट केला. राजेंद्र नरसुडे याला ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवताच राजेंद्र याने गुन्हा कबूल केला. हवालदार संदेश पवार यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली असून, आरोपीवर गुन्हा दाखल झाला आहे. ऑनर किलिंगसारख्या घटनेमुळे वैराग परिसरासह सोलापूर जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

### चारित्र्याच्या संशयामुळे तिचा घात ...

फिरवत दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणाचा धक्कादायक खुलासा झाला आहे. प्रेम प्रकरणातून या मुलीची हत्या झाली असल्याची माहिती समोर आली आहे. ज्या मुलीची हत्या झाली ती मुलगी बुलढाणा जिल्ह्यातील शिंदखेडा राजा येथील रहिवासी होती तर इयत्ता अकरावी मध्ये ती अकोल्यात शिक्षण घेत होती. अल्पवयीन तरुणी आणि तिचा प्रियकर दोघेही बुलढाणा जिल्ह्यातील होते, तिचा १९ वर्षीय प्रियकर अथर्व देशमुख हा नाशिकच्या संदीप फाऊंडेशन या महाविद्यालयात शिक्षण घेत होता बुलढाण्यावरून नाशिकच्या दिशेने येत असताना रस्त्यातच त्याने त्या तरुणीची हत्या करत तिचा मृतदेह सारूळ येथील जंगलात टाकून दिला. ज्या मुलीचा मृतदेह आढळून आला ती मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार अकोला येथील पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती त्यावरून पोलिसांना ओळख पटविण्यात यश आलं आणि त्यानंतर तिच्यात कुटुंबियांना ला माहिती देण्यात आली. अल्पवयीन मुलीच्या हत्येनंतर नाशिक पोलीसांनी अथर्व देशमुख आणि त्याचा साथीदार सुमित देशमुख या दोघांना ताब्यात घेतले आहे. या हत्या प्रकरणात आणखी कुणाचा समावेश आहे का याचा तपास आता नाशिक ग्रामीण पोलिसांकडून सुरू आहे. त्यामुळे या प्रकरणात आणखी काय समोर येतं हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. याबाबत बोलताना नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील म्हणाले की, नाशिकच्या वाडीव्हरे परिसरात मुलीचा मृतदेह आढळला होता. मृतदेहाजवळ असलेल्या कीचेन वरून तपास सुरू केला. सदर मुलीचे अकोला पोलीस स्टेशन हद्दीतून अपहरण झाल्याचं समोर आलं. त्यानंतर काही संशयितांची नावे समोर आली. सातपूर परिसरात १ संशयित आढळून आला. सदर मुलगा बुलढाणा जिल्ह्यातील आहे. ही हत्या प्रेमप्रकरणातून झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आलं आहे. मुलगी ११ वी त तर मुलगा १३ वीमध्ये आहे. नाशिकच्या संदीप फाउंडेशन मध्ये मुलगा शिक्षण घेत आहे. दोघांचे कौटुंबिक संबंध आहेत. मुलीचे दुसरीकडे अफेअर असल्याचा संशय आल्याने बाचाबाचीत हा प्रकार घडला आहे. सध्या अधिक तपास सुरू आहे. समृद्धी महामार्गावर ही हत्या झाल्याचीही माहिती समोर आली आहे. या प्रकरणात आणखी एकाला अटक करण्यात आली आहे.'

### पती आणि पत्नीमधील वाद कोर्टात ...

चिडून होता. मंगळवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास जावयाने सासरे सिकंदर यांना शेतात गाठले आणि त्यांचा गळा चिरला. सासऱ्याचा गळा चिरून तो घरी निघाला होता, मात्र ग्रामस्थांना माहिती होताच, भेदरलेल्या जावयाने चाकूने स्वतःच्या छातीत वार करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या सर्व घटनेची नोंद वळसंग पोलीस ठाण्यात होत आहे. सिकंदर शेख यांना चार मुली आणि दोन मुले आहेत. यामधील दुसऱ्या क्रमांकाची आणि तिसऱ्या क्रमांकाची मुलगी एकाच घरात म्हणजेच पानमंगरूळ (दक्षिण सोलापूर) गावात दिली आहे. संशयित आरोपी सादिक दफेदार हा तिसऱ्या क्रमांकाचा जावई होता. सादिकची पत्नी मुंबई पोलीस दलात कॉन्स्टेबल पदावर कार्यरत आहे. लग्नानंतर सादिक हा पोलीस पत्नीवर संशय घेत होता. काही महिने सादिक दफेदार हा पत्नीसोबत मुंबईत राहत होता. मुंबईत देखील सादिक हा पोलीस पत्नीवर संशय घेऊन मारहाण करत असे. सादिकचे सासरे सिकंदर शेख यांनी अनेकदा बैठका घेऊन जावई सादिक दफेदारची समजूत घालण्याचा प्रयत्न केला होता. मागील वर्ष-दीड वर्षापासून संशयित आरोपी जावई सादिक दफेदार याने राग धरला होता. पोलीस पत्नीलाच खलास करतो, अशी अनेकदा त्याने धमकीही दिली होती. सिकंदर शेख यांनी जावयाला मुलीपासून लांब केले होते आणि घटस्फोटासाठी मुलीमार्फत खटला दाखल केला होता. याचाच राग मनात धरून २४ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास आरोपी जावई सादिक दफेदार याने सासऱ्याचा गळा चिरून हत्या केली. यात सिकंदर शेख यांचा जागीच मृत्यू झाला. इंगळगी गावातील शेतातच जावई सादिक याने सासरे सिकंदर शेख यांची गळा चिरून हत्या केली. आजूबाजूच्या शेतातील शेतकऱ्यांना संशय आला आणि त्यांनी तडफडत असलेल्या सिकंदर यांच्याकडे धाव घेतली. त्यावेळी सादिक दफेदार याने स्वतःवर चाकूने वार करत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. इंगळगी गावातील ग्रामस्थांनी ताबडतोब वळसंग पोलीस स्टेशनला कळविले.

### शिक्षणसेविकेचा विनयभंग करणाऱ्या...

सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास तरुणी घरी असताना बाबुराव किसन जाधव यांनी त्याच्या मोबाईल वरून सदरील तरुणीला फोन केला व तू लातूरला ये असे सांगितले. संस्थाचालक बाबुराव किसन जाधव हा वारंवार पाठलाग करून फोन करत असल्यामुळे वैतागलेल्या तरुणीने आपला भाऊ, आई-वडील यांना सोबत घेत तक्रार देण्यासाठी मुरुड पोलीस ठाणे गाठले. मुरुड पोलीस ठाण्यात तरुणीने आपल्या सोबत होत असलेल्या प्रकाराची माहिती पोलिस अधिकाऱ्याला देत असताना दरम्यानच्या काळात बाबुराव किशन जाधव यांनी फोन करून तू कुठे आहेस? तुला भेटायचे आहे. आपण बाहेर लातूरला जेवण करायला जाऊ असे फोनवर सांगितले. दरम्यान पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्याकडून मिळालेल्या सूचनेनुसार त्या तरुणीने बाबुराव किसन जाधव यांना प्रती प्रश्न करत तुम्ही कुठे आहात असे विचारले असता बाबुराव किसन जाधव यांनी मी लातूर शहरातील दयानंद गेट समोरील मानस लॉजमध्ये दुसऱ्या मजल्यावर रूम नंबर २०५ मध्ये बसून बसलो आहे. तेथे ये असे तिला सांगितले. दरम्यानच्या काळात बाबुराव किसन जाधव यांनी तिला सात ते आठ वेळेस फोन केला तेव्हा सदरील तरुणीने बाबुराव किसन जाधव यांना भेटण्यास नकार दिला असताना देखील बाबुराव किसन जाधव यांनी सदरील तरूणीला तू निराधार आहेस मी तुला आधार देतो पैसे देतो असे प्रलोभन देऊन तरुणीसोबत जवळीकता वाढवण्याचा प्रयत्न केला. पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीवरून मुरुड पोलीस ठाणे येथे गुरंन २८/२०२६ कलम ७८(१), ७८(२). भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणाचा पुढील तपास साहाय्यक पोलिस निरीक्षक श्री उजागरे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय आर. जी. चव्हाण हे करीत आहेत.

02 TO 08 MARCH 2026 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 2/28/2026 8:57 PM Page 1



# गोदावरी पात्रात नियमांची पायमल्ली; माजलगाव आणि परळीत वाळूचा अवैध उपसा जोमात सुरू



**बीड : वार्ताहर**

बीड जिल्हयातील माजलगाव आणि परळी तालुक्यातून वाहणाऱ्या गोदावरी नदीच्या पात्रातून सध्या महसूल आणि पर्यावरण विभागाच्या सर्व अटी-शर्ती धाब्यावर बसवून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पत्रकार लक्ष्मण उजगरे यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांकडे पुराव्यासह तक्रार करत तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव तालुक्यातील आडोळा, गंगामसला आणि परळी तालुक्यातील तेलसमुख येथे अधिकृत वाळू धक्क्यांच्या नावाखाली हा काळा बाजार सुरू आहे. वास्तविक, वाळू उपसा करताना मशिन्सचा वापर करण्यास मनाई असतानाही, या ठिकाणी 'टू-टेन' (२१०), जेसीबी आणि क्रेन यांसारख्या अत्याधुनिक मशिन्सचा वापर करून दिवस-रात्र नदीचे पात्र ओरबडले जात आहे. यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत असून नदीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. या अवैध उपशात वाहतुकीसाठी देखील अनोखी शक्कल लढवली जात असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा आणि टीप्पर चालकांना एकच इन्व्हॉइस (Invoice) जनरेट करून दिले जाते. धक्कादायक बाब म्हणजे, चालकांकडे एक कोरी पावती दिली जाते, ज्यावर ना तारीख असते, ना वेळ, ना ठिकाण. जर वाटेत कुठे तपासणी झाली, तर त्याच वेळी त्यावर माहिती भरून प्रशासनाची दिशाभूल केली जाते. या प्रकारामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. या सर्व प्रकाराची गांभीर्याने दखल घेत पत्रकार लक्ष्मण उजगरे यांनी २५ फेब्रुवारी रोजी बीडचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना लेखी निवेदन दिले आहे. या निवेदनात त्यांनी गोदावरी पात्रातील या अवैध उपशाचे पुरावे सादर केले असून, संबंधित वाळू घाटांवर तात्काळ धाडी टाकून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आता प्रशासन या 'वाळू माफियांच्या' मुसक्या आवळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावर्षी सर्वत्र समाधानकारक पाऊस झाल्याने गोदावरी नदीपात्र अद्यापही पाण्याने तुडुंब भरलेले आहे. नियमानुसार नदीपात्रात पाणी असताना वाळू उपसा करणे किंवा घाटांचा ताबा देणे पर्यावरण नियमांच्या विरोधात आहे. मात्र, असे असतानाही तहसील प्रशासनाने संबंधित वाळू घाटांचा ताबा नेमका दिलाच कसा, असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. यावर्षी पावसाचे प्रमाण चांगले राहिल्याने गोदावरीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात जलसाठा उपलब्ध आहे. पर्यावरण विभागाच्या नियमांनुसार, नदीपात्रात पाणी असल्यास वाळू उत्खननास परवानगी देता येत नाही. असे केल्यास नदीच्या नैसर्गिक प्रवासाला बाधा पोहोचते आणि पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. मात्र, या सर्व नियमांना धाब्यावर बसवून काही घाटांचा ताबा देण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. पाणी असताना घाटांचा ताबा देणे ही बाब गंभीर असून, यात तहसील प्रशासनाची भूमिका संशयास्पद वाटत आहे. नेमक्या कोणत्या आधारे आणि कोणाच्या दबावाखाली हा ताबा देण्यात आला, याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. जर नियम धाब्यावर बसवून हे व्यवहार झाले असतील, तर संबंधित अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. गोदावरी पात्रातील वाढती पाण्याची पातळी पाहता, तातडीने या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर पाऊले उचलणे आवश्यक आहे. अन्यथा, वाळू उपशाच्या नावाखाली नदीपात्राचे आणि पर्यावरणाचे न भरून निघणारे नुकसान होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# वसई-विरार महापालिकेच्या विरोधी पक्षनेतेपद्दाचा कार्यभार भाजपाचे मनोज पाटील यांनी स्वीकारला



**विरार : वार्ताहर**

भारतीय जनता पक्षाचे अभ्यासू आणि अनुभवी नेते मनोज पाटील यांची अखेर अपेक्षेप्रमाणे वसई-विरार शहर महापालिकेच्या विरोधी पक्षनेते पदी वर्णी लागली आहे. त्यांच्या या निवडीमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, काल २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी महापालिका मुख्यालयातील त्यांच्या दालनाचा (कार्यालयाचा) विधिवत पूजाविधीने उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या उद्घाटन सोहळ्याला वसई विधानसभा मतदारसंघाच्या आमदार स्नेहाताई दुबे-पंडित आणि नालासोपारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजन नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती. दोन्ही लोकप्रतिनिधींच्या हस्ते कार्यालयाचे पूजन करून मनोज पाटील यांनी आपल्या नवीन पदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी भारतीय जनता पक्षाचे सर्व नवनिर्वाचित नगरसेवक, पक्षाचे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी पुष्पगुच्छ देऊन मनोज पाटील यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. केवळ राजकीय क्षेत्रातीलच नव्हे, तर महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही या दालनाला सदिच्छा भेट देऊन मनोज पाटील यांचे स्वागत केले. या प्रसंगी बोलताना आ. राजन नाईक यांनी भाजपच्या आगामी रणनीतीवर प्रकाश टाकला. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून वसई-विरार क्षेत्रांत राबवले जाणारे विविध प्रकल्प आणि प्रस्तावित विकासकामांची त्यांनी इत्थंभूत माहिती दिली. भारतीय जनता पक्षाच्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून येत्या काळात शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. मनोज पाटील यांच्या अभ्यासू वृत्तीमुळे महापालिकेत विरोधी पक्षाची बाजू अधिक प्रभावीपणे मांडली जाईल आणि जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळेल, अशी भावना कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

# मनवेलपाडा-विरार पूर्व भागाचा पाणीप्रश्न सुटणार

## अमृत योजनेअंतर्गत नवीन जलवाहिनी जोडणीच्या कामाला सुरुवात



**विरार : वार्ताहर**

विरार पूर्व येथील मनवेलपाडा परिसरातील विवा जांगिड कॉम्प्लेक्स आणि जयश्री जगन्नाथ नगर परिसराला गेल्या अनेक दिवसांपासून भेडसावणारा अनियमित व कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न आता मार्गी लागणार आहे.महापौर अजीव पाटील यांच्या आदेशान्वये, वसई-विरार शहर महापालिकेच्या वतीने केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत ३५० एम.एम. व्यासाची नवीन जलवाहिनी जुन्या लाईनला जोडण्याचे काम २५ फेब्रुवारी पद्मन सरकार नगर येथे युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. प्रभाग क्रमांक ७ चे नगरसेवक प्रशांत राऊत यांनी या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. गेल्या काही काळापासून या परिसरातील नागरिकांना अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे मोठ्या समस्यांचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन अजीव पाटील यांनी महानगरपालिका प्रशासनाला यावर तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार सुरू करण्यात आलेले हे तांत्रिक जोडणीचे काम पूर्ण झाल्यानंतर, विवा जांगिड कॉम्प्लेक्स आणि जयश्री जगन्नाथ नगर, साईराम संकुल, मनाली हॉटेल परिसरातील रहिवाशांना पुरेसा, नियमित आणि उच्च दाबाने पाणीपुरवठा सुरू होईल. या महत्त्वपूर्ण कामामुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, परिसरातील पाणीटंचाईची समस्या कायमस्वरूपी निकालात निघणार आहे, अशी माहिती प्रभाग क्रमांक ७ चे नगरसेवक प्रशांत राऊत यांनी दिली आहे.

# महा आवास अभियानात पालघर जिल्ह्याची सलग तीन वर्षे दमदार कामगिरी; विविध गटांत विभागस्तरीय क्रमांक

**पालघर : वार्ताहर**



महा आवास अभियानांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व राज्य पुरस्कृत आवास योजना प्रभावीपणे राबविताना पालघर जिल्ह्याने सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीत उल्लेखनीय कामगिरी नोंदवत विविध गटांत विभागस्तरावरील क्रमांक पटकावले आहेत. काल दिनांक २५ फेब्रुवारी रोजी सिडको कार्यालय सभागृह, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई येथे कोकण विभागीय स्तरावर आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते पालघर जिल्ह्याचा गौरव करण्यात आला असून जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सन २०२१-२२ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना - सर्वोत्तम जिल्हा परिषद गटात जिल्हा परिषद पालघरने तृतीय क्रमांक मिळविला, तर राज्य पुरस्कृत आवास योजना-सर्वोत्तम जिल्हा परिषद गटात द्वितीय क्रमांक पटकावला. सन २०२२-२३ मध्ये राज्य पुरस्कृत आवास योजना - सर्वोत्तम जिल्हा परिषद गटात जिल्हा परिषद पालघरने तृतीय क्रमांक मिळविला. तसेच पंचायत समिती व ग्रामपंचायत गटातही जिल्ह्यातील संस्थांनी उद्दिष्टपूर्ती, गती व गुणवत्तापूर्ण अंमलबजावणीच्या बळावर मानांकन प्राप्त केले. तर वाळू उपलब्धता मध्ये तहसीलदार जव्हार यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. सन २०२३-२४ मध्ये पालघर जिल्ह्याने उल्लेखनीय झेप घेत प्रधानमंत्री आवास योजना - सर्वोत्तम जिल्हा परिषद गटात प्रथम क्रमांक मिळविला. पंचायत समिती गटात विक्रमगड प्रथम, वाडा द्वितीय व पालघर तृतीय क्रमांकावर राहिले. ग्रामपंचायत गटात मोज (ता. वाडा) प्रथम व खुडेद (ता. विक्रमगड) द्वितीय क्रमांकावर राहिली. राज्य पुरस्कृत आवास योजना - सर्वोत्तम जिल्हा परिषद गटातही जिल्हा परिषद पालघरने प्रथम क्रमांक पटकावला, तर पंचायत समिती वाडा हिने प्रथम क्रमांक मिळविला. या सोहळ्यात माजी जिल्हा परिषद अध्यक्षा वैदेही वाढाण, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प. पालघर) सिद्धाराम सालीमठ, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे तसेच जिल्हा परिषद पालघर चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांनी विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारले. यावेळी डॉ. माणिक दिवे अतिरिक्त आयुक्त (विकास), डॉ. राजाराम दिघे संचालक ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. प्रदीप घोरपडे सहाय्यक आयुक्त, प्रसिद्ध वक्ते प्रशांत देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी याबद्दल आनंद व्यक्त करत सांगितले की, महा आवास अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना सन्मानाने निवारा उपलब्ध झाला आहे. जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या समन्वयातून हे यश शक्य झाले असून पुढील काळातही अधिक चांगली कामगिरी करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. ग्रामीण भागातील पात्र लाभार्थ्यांना वेळेत व दर्जेदार घरे उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने संघभावनेतून काम केले. नियोजनबद्ध अंमलबजावणी, सातत्यपूर्ण आढावा व तळागाळातील समन्वय यामुळे हे यश शक्य झाले. पुढील काळातही ही गुणवत्ता कायम राखण्याचा आमचा प्रयत्न राहील. अशा भावना या निमित्ताने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी व्यक्त केल्या आहेत. पालघर जिल्ह्याच्या या यशाबद्दल जिल्हा परिषद प्रशासन, पंचायत समित्या, ग्रामपंचायती तसेच संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. सलग तीन वर्षांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे कोकण विभागात पालघर जिल्ह्याची मान उंचावली आहे.

# हडपसर येथील सोना आई इंग्लिश मीडियम हायस्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन संपन्न




**पुणे : शंकर जोग**

हडपसर येथील सोना आई इंग्लिश मीडियम हायस्कूल सायन्स जुनिअर कॉलेज मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांचे विज्ञान प्रदर्शन प्रश्नमंजुषा आणि वैज्ञानिक प्रयोगाचे आयोजन केले होते. शाळेचे संस्थापक. अध्यक्ष. प्रमुख पाहुणे ए.एल. नर्सिंग राव यांनी विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाचे कौतुक करत वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता बनकर, शाळेचे ट्रस्टी राज लक्ष्मणराव. स्वर्णा राव. सोनिया मोरे, संदेश मोरे, मनोहर राम रेड्डी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# मोटारसायकल चोरी प्रकरणी तिघांना अटक; २.८५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वसई : वार्ताहर**

नायगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या मोटारसायकल चोरी प्रकरणाचा छडा लावत पोलिसांनी तिघा आरोपींना अटक करून सुमारे २ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दि.१६ फेब्रुवारी २०२६ रोजी एलएनटी कंपनी साईडवर, मुंबई-अहमदाबाद महामार्ग, वायसर ब्रिजजवळ, नायगाव पूर्व येथून फिर्यादी आकाश कोतिक लहाणे (वय २९) यांची होंडा कंपनीची स्कूटी (क्रमांक एमएच-४८ डीबी ८७२९) अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली होती. याप्रकरणी नायगाव पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्र. ७०२/२०२६ भा.दं.वि. कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.



गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने स्वतंत्रपणे तपास सुरू केला. तपासादरम्यान मोसिन चुने खान (वय २१), शाहनवाज मतीन खान (वय २०) आणि हसनेन गुलाम खान (वय १९) या तिघांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीत त्यांनी मिरारोड पूर्व, उरण तसेच दहिसर परिसरात मोटारसायकल चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपींकडून दोन बजाज एनएस पल्सर, एक बजाज १६० प्लसर, एक ॲक्टिव्हा स्कूटी आणि एक ॲव्हेंजर स्कूटी अशा एकूण पाच मोटारसायकली जप्त करण्यात आल्या असून त्यांची अंदाजे किंमत २,८५,००० रुपये आहे. यापैकी मुख्य आरोपी मोसिन चुने खान याच्यावर मिरारोड पोलिस ठाण्यात आणखी दोन गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलिस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलिस उपायुक्त परिमंडळ-२ वर्षे श्रीमती पौर्णिमा चौगुले, सहाय्यक पोलिस आयुक्त नवनाथ घोगरे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय हजारे व पोलिस निरीक्षक (गुन्हे) विजय कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकातील अधिकाऱ्यांनी केली. नायगाव पोलिसांच्या या कामगिरीमुळे परिसरातील वाहनचोरीच्या घटनांना आळा बसण्यास मदत होणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# वाडा तालुक्यातील धानवापाडा येथील मुख्याध्यापीका व विद्यार्थ्यांचा सत्कार



**वाडा : वार्ताहर**

शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने निपुण पालघर गुणवत्ता विकास अभियान, निपुण महाराष्ट्र, सेस फंड आणि स्वच्छ व हरित विद्यालय मूल्यांकन अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळा, शिक्षक व गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण सोहळा कार्यक्रम मंगळवारी(दि.२४ फेब्रुवारी) वीर बिरसा मुंडा सभागृह, जिल्हा परिषद पालघर येथे संपन्न झाला. निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत सुपर नाइन शाळा म्हणून वाडा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा धानवापाडा या शाळेची निवड झाली होती त्याबद्दल येथील मुख्याध्यापिका मनिषा कृष्णा जाधव व दोन विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या हस्ते, तसेच इतर अधिकारी व मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी तर जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी व पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# कचरा जाळणाऱ्यावर लातूर पालिकेची कारवाई; ३0 हजार रुपयांचा दंड वसूल

**लातूर : वार्ताहर**

लातूर शहर महानगरपालिका आता क्शन मोडवर आली आहे. मनपाच्या वतीने शहरात प्लास्टिक कॅरीबॅग जप्ती तसेच स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. कचरा टाकणारे आणि जाळणाऱ्यावर कारवाई करण्यात येत असून संबंधितांकडून दंडाची वसुलीही केली जात आहे. महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे व मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या निर्देशानुसार उपायुक्त वसुधा फड यांच्या मार्गदर्शनात शहरात ही मोहीम राबवली जात आहे. या अंतर्गत शहरातील झोन बी मध्ये औसा रोडवर अतिक्रमण करणारे व सिंगल युज प्लास्टिकचा वापर करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत २ किलो कॅरीबॅग जप्त करून १२ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. शहरात इतर ठिकाणी देखील अशीच कारवाई करून एकूण १२ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. उघड्यावर कचरा टाकणाऱ्या व जाळणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई केली जात आहे. उघड्यावर कचरा टाकणारे ३७ व कचरा जाळणाऱ्या ५ नागरिकांवर मनपाने कारवाई केली. या अंतर्गत १८ हजार रुपये दंडाची आकारणी करण्यात आली आहे. या कारवाईत स्वच्छता विभागाचे कलीम शेख, रमाकांत पिडगे, अक्रम शेख, शिवराज शिंदे, डी.एस. सोनवणे, रवी कांबळे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. शहरातील नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळावा. कचऱ्याचे ओला व सुका असे वर्गीकरण करून तो घंटागाडीतच टाकावा. उघड्यावर कचरा टाकू नये तसेच जाळू नये, असे आवाहन महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे यांनी केले आहे.

# वाडा-भिवंडी महामार्गावरील पाहुनी पाडा येथे कंटेनरला भीषण आग

**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील पाहुनी पाडा येथे भिवंडी-वाडा महामार्गावर सोमवारी दुपारच्या सुमारास एका कंटेनरला अचानक आग लागल्याची घटना घडली. ही आग जवळपास दीड तास धुमसत राहिल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, कंटेनरच्या आतील भागातून प्रथम धूर निघताना दिसला आणि काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण केले. आगीमुळे कंटेनरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच वाडा नगरपंचायतीचे अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग




आटोक्यात आणली. दरम्यान, या घटनेमुळे महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. या आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पुढील तपास सुरू आहे.

02 TO 08 MARCH 2026 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 2/28/2026 8:58 PM Page 1



# अण्णा हजारे ही एक व्यक्ती नसून एक विचार आहे -कल्पना इनामदार




**लातूर : वार्ताहर**

समाजात विविध समाजोपयोगी कामे अण्णा हजारे यांनीच केले पाहिजे असे नाही. अण्णा ही व्यक्ती नसून एक विचार आहे आणि तो विचार प्रत्येक जागरूक नागरिकाने आत्मसात केला पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय लोकआंदोलन न्यासाच्या कार्याध्यक्षा कल्पनाताई इनामदार यांनी केले. अण्णा हजारे प्रणित राष्ट्रीय लोकआंदोलन न्यासचे जिल्ह्यातील संघटन मजबूत करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी गरजूंना अन्नधान्याचे किटही वाटप करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, ॲड. संतोष गिल्डा, न्यासाचे जिल्हाध्यक्ष प्रा.तात्यासाहेब नंदवे, जिल्हा सचिव रामेश्वर सूर्यवंशी, खजिनदार दत्ताभाऊ आवारी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लातूर जिल्ह्यातील दहाही तालुक्यातील तालुका अध्यक्षांना इनामदार यांच्या हस्ते नियुक्ती पत्रे देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. आपल्या मार्गदर्शनात कल्पनाताई इनामदार यांनी आजमितीस संघटन किती महत्वाचे आहे याविषयी अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन केले.

संविधानाचे निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका आणि संघटित व्हा असा संदेश दिला होता. त्या संदेशाचे महत्व आज पदोपदी जाणवत असल्याचे सांगून इनामदार यांनी आज देशातील सामान्य माणूस दिवसेंदिवस गरीब होत चालला आहे. देशाची आर्थिक स्थिती ढासळत चालली आहे. ही बाब चिंताजनक आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असो, त्यांना सामान्य नागरिकांशी काहीही देणे घेणे नसते. सामान्य मनुष्य कोणत्या स्थितीत जगतोय हे कोणत्याही सरकारला पडलेले नाही. आपली लढाई व्यवस्थेविरोधात आहे. कोणत्याही सरकारच्या विरोधात नाही. व्यवस्था बदलण्यासाठी संघटन बांधणी अतिशय गरजेचे आहे. अण्णा हजारे यांनी सामान्यांसाठी असंख्य कामे केली आहेत. देशात बदल घडवून आणण्याचे काम अण्णांनी केले आहे. प्रत्येक व्यक्तीने अण्णा हजारे यांच्यासारखे बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. संघटन माणसाला, समाजाला मजबूत करत असते. अण्णांचा विचार चालवणारी मंडळी सक्रिय राहिली पाहिजे. अण्णांनी कार्यकर्त्यांना जिवंत ठेवणे गरजेचे आहे. संघटन मजबुतीसाठी आपण संपूर्ण देशात दौरे करतो, असेही त्यांनी नमूद केले. संघटन मजबुतीसाठी लोकशिक्षण, समाज जागृती आणि सभासद नोंदणी आवश्यक असून त्यावर पदाधिकाऱ्यांनी भर द्यावा, असे आवाहन केले. यावेळी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, ॲड. संतोष गिल्डा यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. तात्यासाहेब नंदवे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामागची पार्श्र्वभूमी विस्तृतपणे विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन हातिमभाई शेख यांनी तर आभार प्रदर्शन रामेश्र्वर सूर्यवंशी यांनी केले. आभार प्रदर्शनात त्यांनी समाजाचे देणे लागतो या उद्देशाने स्वखर्चातून तब्बल दोन लाख रुपयांचे अन्नधान्य वाटप करून गोर गरीब गरजूंच्या उदरनिर्वाहाचा तात्पुरता प्रश्न मिटवल्याचे सांगितले. याप्रसंगी विकास खटके, असलम शेख, अनिकेत वलांडे, रवींद्र गायकवाड, राहुल गायकवाड, किशोर रणदिवे यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# पालिका व कार्डिनल हॉस्पिटलमध्ये आरोग्य सेवेसाठी सहकार्याचा निर्णय!



**वसई : वार्ताहर**

वसई-विरार शहर महापालिकेचे महापौर अजीव पाटील, उपमहापौर मार्शल लोपीस तसेच सभागृह नेते प्रफुल्ल साने यांचा कार्डिनल ग्रेशियस मेमोरियल हॉस्पिटलच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. हा सत्कार हॉस्पिटलचे चेअरमन युरी घोन्सालविस यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी हॉस्पिटलचे व्हाईस चेअरमन थॉमस ब्रिटो, खजिनदार जोसेफ आल्मेडा तसेच विश्वस्त सर्वश्री रिचर्ड वाझ, रोलन मच्याडो व मार्गरिट कोलासो उपस्थित होते.

सत्कार प्रसंगी बोलताना महापौर अजीव पाटील यांनी कार्डिनल ग्रेशियस मेमोरियल हॉस्पिटलतर्फे नागरिकांना दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सेवांचे कौतुक केले. महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना हॉस्पिटलमधील काही आरोग्य सेवा माफक दरात उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका व हॉस्पिटल प्रशासन यांच्यात आवश्यक करार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या सहकाऱ्यामुळे वसई-विरार परिसरातील नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सेवांचा अधिक लाभ मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच नागरिकांच्या आरोग्य हितासाठी महानगरपालिका व हॉस्पिटल विश्वस्त मंडळाने परस्पर सहकार्याने कार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले. उपमहापौर मार्शल लोपीस यांनी लवकरच वसईतील विविध हॉस्पिटल्सची बैठक आयोजित करून नागरिकांसाठी प्रभावी आरोग्य योजना जाहीर करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच महापालिकेकडून कार्डिनल ग्रेशियस मेमोरियल हॉस्पिटलला आवश्यक ते सर्व सहकार्य कायम राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. या भेटीद्वारे महापालिका व हॉस्पिटल प्रशासन यांच्यात आरोग्य सेवांच्या क्षेत्रात सकारात्मक सहकार्याची नवी दिशा निर्माणाची भावना व्यक्त केली.

# 'मराठी भाषा गौरवदिन' विचार, संस्कृती आणि अभिजाततेचा उत्सव -रेमंड मच्याडो



**वसई : वार्ताहर**

तलासरी तालुक्यातील झरी येथील ज्ञानमाता विद्या मंदिर हायस्कूलमध्ये 'मराठी भाषा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन वसई मराठी ख्रिस्ती साहित्य मंडळाने केले होते. सुमारे ३५० विद्यार्थी उपस्थित असताना मराठी भाषेचे महत्व, तिचा इतिहास आणि अभिजात दर्जा यावर विविध मान्यवरांनी आपले विचार मांडले. सुरुवातीला ज्ञानमाता आदिवासी हायस्कूलच्या मुख्याध्यापिका मा. सिस्टर बॅस्टीयन फर्नांडिस यांना 'उत्कृष्ट मुख्याध्यापिका' पुरस्कार मिळाल्याबद्दल मंडळाने शाल व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले. मराठी भाषा ही विचार व्यक्त करण्याचे, भावना जागृत करण्याचे आणि सामाजिक जोडणीचे प्रभावी साधन आहे. त्यांनी वाचन-लेखन संस्कृतीचे महत्व अधोरेखित करताना सांगितले की वाचनाने ज्ञान, विचारशक्ती व संवेदनशक्ती वाढते, तर लेखनाने समाजातील सुखदुःख प्रतिबिंबित होते. कविता ही सामाजिक जाणीव जागवणारे प्रभावी साधन असल्याचे वसई मराठी ख्रिस्ती साहित्य मंडळाचे अध्यक्ष रेमंड मच्याडो यांनी आपल्या प्रमुख भाषणात बोलतांना सांगितले. मंडळाचे उपाध्यक्ष लेस्ली डिसिल्वा यांनी कुसुमाग्रजांच्या साहित्यसंपदेचा परिचय करून दिला. कार्यकारी सदस्य दीपक मच्याडो यांनी प्रमाणभाषा व बोलीभाषेतील नातेसंबंध विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. मंडळाचे खजिनदार सिडनी मोरायस यांनी मराठीला मिळालेल्या 'अभिजात भाषा' दर्जाचा गौरव केला. 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' या भावगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. स्वागत व आभार अमित मालकरी सरांनी केले तर सूत्रसंचालन लेनी परेरा यांनी केले. दुपारच्या सत्रात हा कार्यक्रम उपलात, धोंधडपाडा येथेही सादर करण्यात आला, जिथे सुमारे ३०० विद्यार्थी उपस्थित होते. उपमुख्याध्यापक राजेंद्र सर व सिस्टर दीपिका पाचुलकर आणि शिक्षक यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# मराठी भाषा दिनानिमित्त ज्येष्ठ साहित्यिका विणा गव्हाणकर यांचा सत्कार

**वसई : वार्ताहर**

शुक्रवारी मराठी राजभाषा दिनानिमित प्रसिद्ध लेखिका, साहित्यिक वीणा गवाणकर, यांचे निवासस्थानी भास्कर आळी, वसई पोलिसांनी त्यांचा सत्कार केला. एक होता कार्व्हर हे त्यांचं पुस्तक चार दशकं तूफान गाजलं. मराठी पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद व्हावा व ४२ आवृत्त्या संपन्न व्हाव्यात यावरूनच त्याच्या लोकप्रियतेचा अंदाज येऊ शकेल. गवाणकर यांच्या सिद्धहस्त लेखणी मधून अशी अनेक साहित्य संपदा जन्माला आली. कृषी, निसर्ग, पर्यावरण आणि पाणी या क्षेत्रांत महत्त्वाचे कार्य करणाऱ्या तज्ज्ञांच्या चरित्रावर आधारित ललितलेखन त्या करतात. त्यांना तीन वेळा महाराष्ट्र शासनाचा वाङ्मय पुरस्कार मिळाला आहे. कोकण मराठी साहित्य परिषदेचा धनंजय कीर पुरस्कार आणि मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचा कै. प्रा. वि.ह. कुलकर्णी पुरस्कार एसएनडीटी विद्यापीठातर्फे २०१४ मध्ये 'वूमन ऑफ दी इयर' पुरस्कारही



त्यांना मिळाला आहे. पर्यावरण साहित्य संमेलनाच्याही त्या अध्यक्षा होत्या. डॉ.आयडा स्कडर-भारतात आरोग्यसेवा देणारी अमेरिकन समाजसेविका आयुष्याचा संगती... इंटिमेट डेथ (अनुवादित, मूळ इंग्रजी लेखिका-डॉ. मारी डी हेनेझेल), एक होता कार्व्हर- अमेरिकेतील पहिला कृष्णवर्णीय शास्त्रज्ञ जॉर्ज वॉशिंगटन कार्व्हर याच्या आयुष्यावर आधारित गोल्डा- एक अशांत वादळ, गोल्डा मेयर डॉ. खानखोजे - नाही चिरा... (डॉ. पां.स. खानखोजे यांचे चरित्र), भगीरथाचे वारस रॉबी डिसिल्वा, सर्पतज्ज्ञ : डॉ. रेमंड डिटमार्स इत्यादी साहित्य त्यांच्या कडून निर्मिती झालेलं आहे. आयुष्यभर केलेल्या त्याच्या कार्याबद्दल कृतज्ञता म्हणुन वसई पोलीस ठाणेतर्फे सन्मान चिन्ह, शाल, श्री फळ आणि पुष्पगुच्छ देऊन आभार मानले. सदरवेळी नवनाथ घोगरे, सहाय्यक पोलिस आयुक्त, वसई विभाग, बाळकृष्ण घाडीगांवकर, व.पो.नि. वसई पोलीस ठाणे.पो. उप नि. वैभव पवार, पो.शि. सुरज पाटील, पो.शि. रोहिदास कुराडे, पो.शि. पांडुरंग भुसारे हे उपस्थित होते.

# निलेश चौधरी यांचा स्थायी समिती अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल



**विरार : वार्ताहर**

भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित नगरसेवक निलेश चौधरी यांनी आज शुक्रवार २७ रोजी स्थायी समिती अध्यक्षपदासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. हा क्षण केवळ एक औपचारिकता नसून, पक्षाच्या विचारसरणीवर आणि विकासाच्या ध्येयावर असलेल्या दृढ विश्वासाचे प्रतीक आहे. नगरसेवक निलेश चौधरी यांनी नालासोपारा पूर्व भागातून प्रभाग क्र. सोळा येथून भाजप मधून निवडणूक लढवली होती. तेथून ते पहिल्यांदा महापालिकेत निवडून आले आहेत. या प्रसंगी महापालिकेतील भाजपचे विरोधी पक्षनेते मनोज पाटील, गटनेते अशोक शेळके, भाजपाचे महासचिव मनोज बारोट, स्थायी समिती सदस्य जितेंद्र पाटील, अभय कक्कड, युवा मोर्चा अध्यक्ष विनीत तिवारी तसेच इतर भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत डॉ. शुभम् राजेश पाटील यांचे उल्लेखनीय यश

**विरार : वार्ताहर**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या संशोधन विभागा तर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२५-२६ मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून कै. पांडुरंग रघुनाथ पाटील उत्कर्ष माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय विरार येथे रसायनशास्त्र विभागात सहाय्यक शिक्षिका पदावर कार्यरत असणाऱ्या डॉ. शुभम् राजेश पाटील यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिल्हास्तरावर सहभागी झालेल्या महाराष्ट्रातील एकूण १०७० स्पर्धकांमधून राज्य स्तरासाठी निवड झालेल्या ७० स्पर्धकांमध्ये स्थान मिळवत स्पर्धेत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी नोंदविली.

पालघर जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून प्रथम पारितोषिक प्राप्त करून राज्यस्तरीय स्पर्धेत सादर करण्यात आलेल्या मनोयात्रा या पौगंडावस्थेतील अवस्थेतील विद्यार्थ्यांना मानसिक आधार देण्यासाठी केलेल्या नवोपक्रमाला




परीक्षकांकडून विशेष दाद मिळाली असून उत्तेजनार्थ पारितोषिक प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा सन्मान राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथे महात्मा फुले सभागृहात दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. यावेळी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथील मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास परिषदेचे संचालक डॉ. हेमंत वसेकर, सहसंचालक डॉ. कमलादेवी आवटे, उपसंचालक (समन्वय विभाग) डॉ. इब्राहिम नदाफ तसेच संशोधन विभागप्रमुख डॉ. दत्तात्रय थिटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शिक्षण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण कल्पना, विद्यार्थी केंद्रित अध्यापन पद्धती आणि प्रभावी शैक्षणिक उपक्रम यामुळे हा नवोपक्रम विशेष ठरला. डॉ. शुभम राजेश पाटील यांच्या यशामध्ये कै. पांडुरंग रघुनाथ पाटील उत्कर्ष कनिष्ठ महाविद्यालय, विरारच्या समन्वयक श्रीम. कल्पना राऊत मॅडम व नारायण कुट्टी सर, माजी प्राचार्या सौ. मुग्धा लेले मॅडम, प्राचार्या सौ. चित्रा ठाकूर मॅडम, उपप्राचार्य सौ. कुसुम नाईक मॅडम, सौ. हेमा पाटील मॅडम आणि रमेश पाटील सर तसेच त्यांचे सर्व सहकारी, नवोपक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी व कुटुंबीय यांचे मोलाचे सहकार्य आणि प्रोत्साहन आहे आणि त्यांच्या पाठिंब्यामुळेच हे शक्य झाले आहे. याबद्दल त्या सर्वांच्या मनःपूर्वक आभारी आहेत. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पालघरचे प्राचार्य संभाजी भोजने सर आणि समन्वयक तानाजी डावरे सर तसेच डॉ. संगीता सेरेजो यांनी या नवोपक्रमाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर विशेष मार्गदर्शन केले. महाराष्ट्र राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत आयोजित या स्पर्धेचा उद्देश शिक्षकांमधील संशोधनवृत्ती, सर्जनशीलता आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्रोत्साहन देणे हा आहे. प्राप्त झालेल्या या यशाबद्दल शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून संस्थेचे सहकारी, विद्यार्थी व शिक्षणप्रेमींनी गौरव व्यक्त केला आहे. या यशामुळे नवोपक्रमाधारित शिक्षणाला चालना मिळणार असून भविष्यातही अशाच गुणवत्तापूर्ण शैक्षणिक उपक्रमांची प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# पेसा भरती प्रक्रिया शासनाच्या व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून ८१९ शिक्षण सेवकांना नियुक्ती -मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे



**पालघर : वार्ताहर**

पेसा क्षेत्रासाठी अनुसूचित जमाती प्रवर्गातील शिक्षण सेवक पदाच्या ८१९ रिक्त पदांची भरती प्रक्रिया कायदेशीर व पारदर्शक पद्धतीने पूर्ण करून संबंधित उमेदवारांना नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी केले. खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार राजेंद्र गावित तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील, शिक्षणाधिकारी प्राथमिक सोनाली मातेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत काल या नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यात आले. या निर्णयामुळे पेसा क्षेत्रातील शिक्षण व्यवस्थेला बळकटी मिळणार असून स्थानिक अनुसूचित जमातीतील पात्र उमेदवारांना न्याय मिळाला आहे. पेसा क्षेत्रातील भरती संदर्भात सन २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयात प्रकरण दाखल झाले होते. त्यानंतर दि. ५ ऑक्टोबर २०२४ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार संबंधित उमेदवारांना मानधन तत्वावर कार्यरत ठेवण्यात आले होते. पुढे दि. ११ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार तसेच मा. आयुक्त (शिक्षण) यांच्या दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या पत्रानुसार या उमेदवारांना शिक्षण सेवक पदावर नियमित नियुक्ती देण्यात आली. या भरती प्रक्रियेत रिक्त पदांच्या मर्यादेत एकूण ८१९ पदे भरण्यात आली. पेसा क्षेत्रातील ग्रामनिहाय अनुसूचित जमाती लोकसंख्येच्या प्रमाणानुसार पदभरती करण्यात आली आहे. ज्या गावांमध्ये अनुसूचित जमाती लोकसंख्या ०.२५ (२५ टक्क्यांपर्यंत) आहे, तेथे २५ टक्के पदे; २५ ते ५० टक्के लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये ५० टक्के पदे; तसेच ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये रिक्त पदांच्या ५० टक्के पदे भरण्यात आली आहेत. याचबरोबर मानधन तत्वावर कार्यरत असलेल्या १६ ग्रामसेवकांनाही नियुक्ती आदेश देण्यात आले असून, पेसा क्षेत्रात त्यांची कंत्राटी स्वरूपात नियमित नियुक्ती करण्यात आली आहे. रिक्त पदांच्या ५० टक्के मर्यादेतच सर्व ८१९ उमेदवारांना सामावून घेण्यात आले असून, शासनाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करून आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सर्वांना न्याय मिळेल याची पूर्ण काळजी घेण्यात आली आहे, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी केले. नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर सर्व उमेदवारांनी आनंद व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले.

# समाज माध्यमातून जागतिक स्तरावर मराठी भाषेचा सन्मान वाढवावा - उप जिल्हाधिकारी अंजली मरोड

**सोलापूर : इरप्पा बोरीकरजगी**

जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याची बाब ही मोठा सन्मान आहे. आपली मराठी भाषा साधी, सरळ व सहज बोलली जाणारी असून तिच्या लयीत ठराविक अंतराने बदल होत असतो. इतर राज्यातील लोक सहज मराठी भाषा आत्मसात करतात. आजच्या काळात सोशल मीडियाच्या माध्यमातून मराठी भाषेचा जागतिक स्तरावर सन्मान वाढवावा, प्रत्येक व्यक्तीने महिन्यातून किमान एक तरी मराठी पुस्तक वाचावे, यामुळे वाचनाची आवड निर्माण होऊन समाज समृद्ध होतो, असे प्रतिपादन कार्यक्रमाच्या अध्यक्ष उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा मराठी भाषा समिती सचिव अंजली मरोड यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी मराठी भाषा गौरव दिन सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात साजरा




करण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कासेकर, अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे प्राध्यापक शिवाजी शिंदे, प्राध्यापिका श्रुती वडकबाळकर, तहसीलदार सरस्वती पाटील, तहसीलदार पूनम दंडीले, मराठी भाषा समिती सदस्य पद्माकर कुलकर्णी आदी मान्यवर व शासकीय अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. प्राध्यापिका श्रुती वडकबाळकर यांनी मराठी भाषा ही देशातील तिसरी सर्वाधिक बोलली जाणारी भाषा असल्याचे सांगितले. संत साहित्यामुळे मराठी भाषा समृद्ध झाली असून ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथामुळे ती सर्व समाजापर्यंत पोहोचली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. मराठी भाषेत ४८ प्रकारचे काव्य रचले गेले असून कवितेमध्ये शब्दांचे सामर्थ्य प्रभावी असते, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी मराठी शाळांची संख्या कमी होत असल्याची खंतही व्यक्त केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला उपस्थित सर्व मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. प्रास्ताविक प्राध्यापक शिवाजी शिंदे यांनी केले. त्यांनी मराठी भाषा शिकण्यास सोपी व समृद्ध असल्याचे सांगितले. जुने ग्रंथ संगणकीकरणाद्वारे जतन होत असून भविष्यातील पिढ्यांसाठी ते महत्त्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच मराठीत अधिकाधिक साहित्य व काव्यनिर्मिती व्हावी, असेही त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी मराठी भाषा समिती सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला.